रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १७८
www.ramprahar.com

◆ बुधवार, १४ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

मतदानाच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सतर्क/३
रायगडात समृद्ध पंचायतराज अभियानात घरपट्टी वसुली/५
बेंच प्रेस चॅम्पियनशिपमध्ये जितेश साजेकरला ‘कांस्य’/८

## महापालिका निवडणूक प्रचाराच्या तोफा थंडावल्या




**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा मंगळवारी (दि. १३) संध्याकाळी थंडावल्या. गेल्या दहा-बारा दिवसांपासून सुरू असलेला जाहीर प्रचाराचा धुराळा आता खाली बसला आहे. मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने भाजप, दोन्ही शिवसेना, दोन्ही राष्ट्रवादी, काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी यासह इतरही अनेक पक्षांच्या नेत्यांनी महाराष्ट्रात विविध ठिकाणी दौरे केले. मंगळवारी जाहीर प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने सर्व राजकीय पक्षांनी संपूर्ण लक्ष केंद्रित केले होते. उमेदवारांनी प्रचारफेऱ्या काढून मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. राज्यातील ८९३ प्रभागांमधील २८६९ नगरसेवकपदांसाठी गुरुवारी (दि. १५) मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. सकाळी साडेसात ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान मतदान प्रक्रिया होईल.

# झेडपी, पंचायत समिती निवडणुकीचा बिगूल वाजला

### ५ फेब्रुवारीला मतदान, ७ तारखेला मतमोजणी




**असा आहे निवडणूक कार्यक्रम**

- **अर्ज दाखल करणे : १६ ते २१ जानेवारी**
- **अर्जांची छाननी : २२ जानेवारी**
- **अर्ज माघारीची अंतिम मुदत : २७ जानेवारी दुपारी ३पर्यंत, तर याच दिवशी दुपारी ३.३०नंतर अंतिम उमेदवार यादी व चिन्हवाटप**
- **मतदान : ५ फेब्रुवारी, सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३०पर्यंत**
- **मतमोजणी : ७ फेब्रुवारी, सकाळी १० वाजल्यापासून**

**मुंबई : प्रतिनिधी**

नगरपालिका, महापालिका निवडणुकानंतर राज्याचे लक्ष लागलेल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची घोषणा मंगळवारी (दि. १३) निवडणूक आयोगाकडून करण्यात आली. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान आणि ७ फेब्रुवारीला निकाल जाहीर होणार आहे. आयोगाकडून घोषणा होताच निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

पत्रकार परिषदेत राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी सांगितले की, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्हा परिषदांची आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी नामनिर्देश प्रक्रिया ही ऑफलाईन पद्धतीने राबविली जाणार आहे.

या निवडणुकीसाठी राज्यात एकूण २५ हजार ४८२ मतदान केंद्र असणार आहेत. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण अशी दोन मते द्यावी लागतील. १ जुलै २०२५ची मतदार यादी वापरली जाईल. जिथे महिला मतदारांची संख्या जास्त आहे, त्यांच्यासाठी पिंक मतदान केंद्र असणार आहे. या मतदान केंद्रावर केवळ महिला अधिकारी, कर्मचारी असतील.

उमेदवाराकडे जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर जात पडताळणीसाठी केलेला अर्ज सादर करणे आवश्यक आहे तसेच सहा महिन्यांचा आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे, असे या वेळी स्पष्ट करण्यात आले.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण मर्यादा ५० टक्क्यांच्या वर गेलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक दुसऱ्या टप्प्यांमध्ये घेतली जाणार आहे.

### राजिपच्या ५९ गटांसह १५ पंचायत समित्यांच्या ११८ गणांमध्ये रणधुमाळी

**अलिबाग :** राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीचा कार्यक्रम जारी केला आहे. त्यानुसार रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ गट आणि १५ पंचायत समित्यांच्या ११८ गणांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. झेडपी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे राजकीय हालचाली वाढल्या आहेत.

जिल्ह्यात पनवेल तालुक्यात सर्वाधिक आठ जि.प. मतदारसंघ आहेत. त्या खालोखाल अलिबाग तालुक्यात सात, कर्जत सहा, पेण व महाड प्रत्येकी पाच, खालापूर, रोहा, उरण व माणगाव प्रत्येकी चार, तर सुधागड, मुरूड, तळा, म्हसळा, पोलादपूर व श्रीवर्धनमध्ये प्रत्येकी दोन अशी मतदारसंघ विभागणी आहे. त्याचप्रमाणे १५ तालुक्यांच्या पंचायत समित्यांमध्ये एकूण ११८ मतदारसंघ आहेत.

# पनवेल मनपा स्मार्ट बनवणार -आमदार प्रशांत ठाकूर

### ■ सर्वांगीण अन् शाश्वत विकासासाठी भाजप महायुतीचे संकल्पपत्र




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे खंबीर नेतृत्व आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रगतशील सरकार असल्यामुळे विकासाला एक नवी दिशा आणि नवी गती मिळाली आहे. या विकासप्रवाहात आपली पनवेल महानगरपालिका अग्रस्थानी असावी या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून महापालिकेमार्फत विशेष प्रकल्प राबविले जात आहेत. माझं शहर माझा अजेंडा या उपक्रमाद्वारे हजारो लोकांनी आम्हाला विकासकामांच्या बाबतीत ज्या सूचना दिल्या; त्याप्रमाणे संकल्पपत्र अर्थात जाहीरनामा तयार केला आहे, अशी माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १३) येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

पनवेल महापालिकेत पुन्हा एकदा भारतीय जनता पक्ष व महायुतीची सत्ता आल्यानंतर केंद्र व राज्य शासनाचा भरघोस निधी उपलब्ध करून एक आदर्श, प्रगत आणि स्मार्ट महापालिका म्हणून देशात वेगळी ओळख निर्माण करू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी येथील जनतेला या वेळी आश्वासित केले.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषेदेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे, आरपीआयचे शहराध्यक्ष निलेश सोनावणे, शिवसेनेचे उपमहानगरप्रमुख सचिन मोरे, महेश सावंत आदी महायुतीचे पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, पनवेल शहरासह खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा तसेच ग्रामीण भागातील नागरिकांच्या विकासाच्या अपेक्षा, समस्या आणि गरजा मला पूर्णपणे ज्ञात आहेत. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्या झपाट्याने वाढली, त्या वेगाने विकास होणे अपेक्षित आहे. महापालिकेची निर्मिती ही विकासाची नवी पहाट ठरली आहे.

पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (आठवले) महायुतीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मताधिक्याने विजयी करून या वचननाम्याची अंमलबजावणी करण्याची संधी मिळेल आणि त्या अनुषंगाने सुरक्षित, स्वच्छ, सशक्त आणि अभिमानास्पद पनवेल घडविण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले.

सक्षम पाणी व्यवस्थापन, दर्जेदार रस्ते आणि मजबूत पायाभूत सुविधा, सक्षम अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन, शिक्षण, सक्षम आणि स्मार्ट सार्वजनिक वाहतूक, महिलांची सुरक्षा, सक्षमता आणि सन्मान, पूल उड्डाणपूल व सुरक्षित वाहतूक, सशक्त आरोग्यसेवा, सुरक्षित गृहनिर्माण व दिलासादायी करसवलती, क्रीडा व क्रीडापटूंचा विकास, स्मार्ट सिटी स्मार्ट सोल्युशन, उद्याने, निसर्ग, स्वच्छता, ज्येष्ठांचा सन्मान आणि सुरक्षा, गावांचा सर्वांगीण विकास, तलावांचा विकास, कायदा व सुव्यवस्था, नागरी सुविधा, कन्व्हेशन सेंटर, नाट्यगृहे, संस्कृती, विचार आणि श्रद्धेचा सन्मान, आधुनिक सुविधा, नियोजनबद्ध शहर तसेच इतर सुविधांचा त्यांनी उहापोह केला. महायुतीच्या उमेदवारांनी आम्ही नियोजनबद्ध प्रचार केला, लोकांशी संवाद साधला. त्यामुळे घेतलेल्या मेहनतीच्या जोरावर आणि सुज्ञ मतदारांच्या ताकदीवर मोठा विजय मिळवणार आहोत, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी ठामपणे सांगितले. (पान ५ वर..)

### विरोधकांनी जनतेचा विश्वास गमावला

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विरोधकांच्या आरोपांचा समाचार घेतला. ते म्हणाले, विरोधक एका अर्थाने मी आणि परेश ठाकूर महापालिका चालवतात असे दाखवण्याचा प्रयत्न केला. भाजपने आमदाराच्या नातेवाईकाला तिकीट न देण्याचा निर्णय घेतला, मात्र माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच निवडणूक लढणार नसल्याचे जाहीर केले होते. ते निवडणूक लढवत नाहीत. तरीही आमच्यावर आरोप करत आहेत. त्यांनी आरोप करण्यापूर्वी विचार करावा व नंतरच आरोप करावेत.

आमच्यावर ज्यांनी भ्रष्टाचाराचा आरोप केला, त्यांच्या बॅनरवर कर्नाळा बँक बुडविणाऱ्याचे फोटो आहे आणि त्या बँकेच्या ठेवीदारांचे पैसे आमच्या प्रयत्नातून मिळाले आहेत. जनतेचा विश्वास विरोधकांनी गमावलेला आहे. त्यांनी त्यांच्या अंतर्मनात डोकावून बघावे. सहा जण बिनविरोध निवडून आले. त्यांच्या विरोधात प्रतिस्पर्धी उमेदवारांची कुठलीही तक्रार नाही. त्यांची मुलाखत घ्या. पैसे दिले का, त्यांच्यावर दबाव होता का? मग तुम्ही सक्षम उमेदवार दिले होते की, नाही याचा विचार केला नसेल, तर तुम्हाला त्यावर बोलण्याचा अधिकारच नाही, असा मौलिक सल्लाही त्यांनी विरोधकांना दिला.

## निवडक

### ‘सीमेपलीकडे आठ दहशतवादी कॅम्प; भारत कारवाई करणार’

**नवी दिल्ली :** ऑपरेशन सिंदूरवेळी पाकिस्तानने कुरापती सुरूच ठेवल्या असत्या, तर भारतीय लष्कर पाकिस्तानवर हल्ला करण्याच्या पूर्ण तयारीत होते, असे लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी मंगळवारी (दि. १३) दिल्लीतील मानेकशॉ सेंटर येथे झालेल्या वार्षिक पत्रकार परिषदेत म्हटले तसेच सीमापार पाकिस्तानमध्ये आठ दहशतवाद्यांचे कॅम्प सक्रिय आहेत. त्या कॅम्पबद्दल माहिती गोळा केल्यानंतर सैन्य कारवाई केली जाईल, असा इशाराही दिला.

### १० मिनिटांत वस्तू घरपोच देण्याची सुविधा होणार बंद

**नवी दिल्ली :** १० मिनिटांत वस्तू घरपोच देण्याची सुविधा बहुतांश कंपन्या लवकरच बंद करणार आहेत. यामुळे या वस्तू घरपोच करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेची निश्चिती होईल. या संदर्भात ब्लिंकिट, झेप्टो, झोमॅटो, स्विग्गी यासारख्या कंपन्यांच्या प्रतिनिधींची सरकारने बैठक घेतली होती आणि जलद वस्तू पोहचवण्यासंदर्भात काळजी व्यक्त केली होती. त्यानुसार ब्लिंकिटने त्यांच्या जाहिरातींमधून १० मिनिटांत डिलिव्हरीचे आश्वासन काढून टाकले आहे. येत्या काही दिवसांत इतरही कंपन्या याची अंमलबजावणी करण्याची शक्यता आहे.

## ‘दिबां’ना अभिवादन





**पनवेल : जनसेवेचे व्रत अंगीकारलेले सर्वसामान्यांचे कैवारी आणि प्रकल्पग्रस्तांचे झुंजार लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या १००व्या जयंतीनिमित्त त्यांच्या संग्राम निवासस्थानी भेट देऊन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी विनम्र अभिवादन केले. त्यांच्यासमवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस व नगरसेवक नितीन पाटील, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे आदी उपस्थित होते. सर्वांनी ‘दिबां’च्या प्रतिमेला वंदन केले. (अधिक छायाचित्र पान ६ वर..)**

# लोकनेते दि.बा. पाटील यांचे कार्य अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे उद्‌गार; वडघर येथे आरोग्य शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते दि.बा. पाटील यांचे कार्य हीच त्यांची खरी ओळख होती आणि त्यांचे हे महान कार्य येणाऱ्या अनेक पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील, असे उद्‌गार आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १३) पनवेलमधील वडघर येथे काढले. भूमिपुत्रांचे कैवारी, लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या १००व्या जयंतीचे औचित्य साधून वडघर येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत मोफत आरोग्य तपासणी आणि चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ‘दिबां’नी आपले संपूर्ण आयुष्य प्रकल्पग्रस्त आणि शेतकऱ्यांच्या हक्कासाठी अर्पण केले. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात सर्वसामान्य जनतेला उत्तम आरोग्यसेवा मिळावी या उदात्त हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

या शिबिरास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन ‘दिबां’च्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. (पान ५ वर..)



# आगामी पाच वर्षांत पनवेलचा कायापालट होणार -मुख्यमंत्री






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने कळंबोली येथे अभिनेते प्रसाद ओक आणि अभिनेत्री अमृता खानविलकर यांनी देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी (दि. १२) प्रकट मुलाखत घेतली. या मुलाखतीमध्ये विविध प्रश्नांची उत्तरे देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी आगामी पाच वर्षांत पनवेलकरांना कायापालट होताना पहायची संधी मिळणार असल्याचे सांगितले.

या संवाद मेळाव्याच्या अनुषगांने उपस्थित मान्यवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत, सन्मान केला. मेळाव्याला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, ‘दिबां’चे पुत्र अतुल पाटील, डॉ. गिरीश गुणे, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शिवदास कांबळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिनेते प्रसाद ओक आणि अभिनेत्री अमृता खानविलकर यांनी सूत्रसंचालन व संवादाच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील विकासकामे, नागरी समस्या, पाणीपुरवठा तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणासंदर्भात प्रश्न विचारले. विमानतळाच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले, की नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच त्यावर शिक्कामोर्तब होईल,

विमानतळाभोवती नैना प्रकल्पाच्या माध्यमातून नियोजित शहर उभे राहत असून एज्यु-सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी आणि मेडि-सिटी विकसित केली जात आहे. एज्यु-सिटीमध्ये १२ आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचा समावेश व त्यापैकी सात विद्यापीठांना ’लेटर ऑफ इंटेंट’ मिळाले आहेत, तर उर्वरित पाच संस्थांशी चर्चा अंतिम टप्प्यात आहेत.

पनवेल महापालिका क्षेत्राला शिलार धरणातून पाणीपुरवठा केला जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. या संदर्भातील फाईल गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होती, परंतु आपण मुख्यमंत्री झाल्यानंतर तातडीने कार्यवाही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. (पान २ वर..)

## ऐतिहासिक रायगडावर लवकरच ३६० डिग्री लाईट ॲण्ड साऊंड शो

**महाड : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या किल्ले रायगडाचा गौरवशाली इतिहास आता अधिक भव्य आणि दिव्य स्वरूपात अनुभवता येणार आहे. रायगड प्राधिकरणातर्फे गडावर लवकरच देशातील पहिला ३६० डिग्रीतील भव्य लाईट ॲण्ड साऊंड शो सुरू होणार असून शिवप्रेमींसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून साकारण्यात येणारा हा शो तब्बल ४५ मिनिटांचा असेल. यामध्ये प्रकाश आणि ध्वनीच्या माध्यमातून शिवकाळातील महत्त्वाचे प्रसंग जिवंत केले जातील. भव्य बाजारपेठ, नगारखाना, राजसदर, जगदीश्वर मंदिर आणि शिवसमाधी स्थळ या ऐतिहासिक वास्तू प्रकाशाने उजळून निघतील. मावळ्यांचे शौर्य आणि डोळे दीपवणारा शिवराज्याभिषेक सोहळा प्रेक्षकांना प्रत्यक्ष अनुभवता येणार आहे.

या प्रकल्पाबाबत शिवप्रेमींमध्ये प्रचंड उत्सुकता असली तरी केंद्रीय पुरातत्व विभागाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुरातत्व विभागाने सुरक्षेच्या कारणास्तव सूर्यास्तानंतर गडावर मुक्काम करण्यास मनाई केली आहे, मात्र हा शो रात्रीच्या वेळी होणार असल्याने शिवप्रेमींच्या राहण्याची व्यवस्था आणि प्रवेशाबाबत पुरातत्व विभाग काय निर्णय घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# आगामी पाच वर्षांत पनवेलचा कायापालट होणार -मुख्यमंत्री

पान १ वरुन



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर ’मालमत्ता कराबाबतचे गॅरंटी कार्ड’ आणि ’शपथेवरचा हमीनामा’ सादर करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. विशेष म्हणजे निवडणुकीच्या वेळीच हा मुद्दा कसा निर्माण होतो असा प्रश्न समस्त पनवेलकर जनतेत निर्माण झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कळंबोलीतील रोडपाली मैदानावर झालेल्या संवाद मेळाव्यात विरोधकांचा सडेतोड समाचार घेतला. जे सत्तेतच येणार नाहीत, त्यांनी काहीही लिहून दिले तरी पनवेलकर या भूलथापांना बळी पडणार नाहीत. उद्या ते ताजमहाल आणि मोटार गाडी देण्याचीही स्टॅम्प पेपरवर हमी देतील, मात्र ते शक्य आहे का,’ अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांची खिल्ली उडवली.

रायगड आणि ठाणे या दोन जिल्ह्यांना जोडणारी पनवेल महापालिका ही केवळ प्रशासकीय यंत्रणा न राहता, भविष्यातील तिसऱ्या मुंबईची प्रवेशद्वार ठरत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, नैना प्रकल्प आणि पनवेल महापालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधांमुळे हा संपूर्ण परिसर महाराष्ट्राच्या विकासाचा नवा ग्रोथ इंजिन ठरणार आहे. त्यामुळे तिसऱ्या मुंबईच्या उभारणीत महापालिकेची निर्णायक भूमिका असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**प्रश्न (प्रसाद ओक) : आज राजमाता जिजाऊ यांची जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती. स्वामी विवेकानंदांच्या जीवनाचा तुम्ही बराच अभ्यास केलाय, अशी आमची माहिती आहे. अनेक पिढ्यांच्या तरुणाईला प्रेरणा देणाऱ्या स्वामी विवेकानंदांबद्दल काय सांगाल?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** सर्वप्रथम जिजाऊ माँसाहेबांना या ठिकाणी मी आदरांजली अर्पित करतो आणि आपण सर्वच जाणतो की, ज्या काळामध्ये या देशांमध्ये अनेक राजा आणि राजवाडे हे मुघलांचा मंडलिकत्व स्वीकारून त्या ठिकाणी काम करत होते अशा काळामध्ये या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये आई जिजाऊ माँ साहेबांनी स्वराज्याचे स्वप्न बघितले आणि शिवबांना सांगितले की, तुला स्वराज्य स्थापन करायचे आहे. जिजाऊ माँसाहेबांमुळेच छत्रपती शिवाजी महाराज घडले आणि महाराजांनी एक असे स्वराज्य तयार केले की जे पुढे मराठ्यांनी अटकेपार नेले आणि म्हणून मला असे वाटते की, दिल्लीच्या सिंहासनावर ते सिंहासन काबीज दोन वेळा करणारे हे फक्त मराठे होते. ही आपली जी शक्ती आपल्याला मिळाली. ती छत्रपती शिवरायांमुळे आणि ती आई जिजाऊंमुळे.

जर आपण आधुनिक युगाकडे जर आलो तर हे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंदांकडे पाहतो. विवेकानंदांनी अद्वेत वेदांत आणि विज्ञान याची सांगड घातली. वेदांताचे सिद्धांत आपल्यासमोर मांडले आणि मोठ्या प्रमाणात तरुणाईला त्यांनी प्रभावित केले. त्यांनी ज्या वेळेस शिकागोच्या धर्म परिषदेमध्ये भाषण केले. ते जे ऐतिहासिक भाषण आहे ’माय सिस्टर ब्रदर्स ऑफ अमेरिका’. त्या भाषणाने लोकं एकदम मंत्रमुग्ध झाले. एका अमेरिकन महिलेला विचारले की विवेकानंदानी काय केले, ती महिला म्हणाली मला माहिती नाही, पण त्यांच्या भाषणाने माझ्या शरीरात एखादा विजेचा करंट जावा तसे त्यांचे शब्द गेले आणि मला समजत नाही मी एवढे मंत्रमुग्ध झाले. स्वामी विवेकानंद हे ज्या वेळी तिथे गेले होते ना त्या वेळी लोक त्यांच्याकडे अशा नजरेने पाहत होते की हा कोण भारतातला प्रतिनिधी आहे. एक भगवा कपडा कमरेला बांधला, एक भगवा कपडा खांद्यावर टाकला, एक भगवा कपडा डोक्याला, काय धर्माबद्दल सांगणार आहे, पण त्यांच्या त्या एका भाषणाने त्यानंतरच संपूर्ण अमेरिका आणि युरोपमधील प्रत्येक देशामध्ये फ्रंट पेजवर वृत्तपत्राच्या किंवा त्यांचाच विचार आला आणि एका भागाने त्यांनी दिग्विजय मिळवला. म्हणून ती प्रेरणा आहे आणि दुसरे एक महत्त्वाचे आहे की स्वामीजी काय होते तर ते ज्या वेळेस नॉर्थ अमेरिकेकडे चालले होते त्या वेळी जपानला जाणारे जमशेदजी टाटा त्यांना भेटले. त्या जहाजावर त्यांनी जमशेदजी टाटांना विचारले की, तुम्ही पुढे चालला आता. टाटा असे म्हणाले की, मी पोलादाची टेक्नॉलॉजी आणण्याकरिता जपानला चाललोय. त्या वेळी स्वामी विवेकानंदांनी त्यांना दोन सूचना केल्या. ते म्हणाले. पहिल्यांदा तर तुम्ही तिकडे जाऊ नका. तिथली टेक्नॉलॉजी, त्यातील तंत्रज्ञान तुम्ही भारतामध्ये आणा आणि दुसरे अध्यात्म आणि विज्ञान याच्यामधला वेळ काय तो त्यांनी सांगितला तसेच म्हटले की, आपल्याला कुठल्याही परिस्थितीत भारतामध्ये विज्ञानावर संशोधन करणारी इन्स्टिट्यूट सुरू केली पाहिजे. टाटांनी १८९८मध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इम्प्रिकल सायन्सेस ही बंगलोरला तयार केली आणि पत्र स्वामी विवेकानंदांना पाठवले की तुम्ही सांगितल्याप्रमाणे इन्स्टिट्यूट मी तयार केली आहे. आता या इन्स्टिट्यूटचे पहिले व्हॉईस चॅन्सलर तुम्ही झाले पाहिजेत. त्यावर स्वामी विवेकानंद यांनी उत्तर दिले, मला ईश्वराने यापेक्षा खूप व्यापक काम करण्याकरिता पाठवलंय. मी एका ठिकाणी स्वतःला बांधून ठेवू शकत नाही, पण ही संस्था भारतामध्ये विज्ञान विश्व समाज तयार करण्याकरिता एक अतिशय महत्त्वाची संस्था ठरेल आणि आज आपण पाहतोय भारतातील ती एक ठरली आहे. स्वामी विवेकानंद यांनी भारताच्या तरुण पिढीला विसाव्या शतकात सांगितले होते की, २१ वे शतक हे भारताचे असेल. आज आपण पाहून राहिलो आहे की २१वे शतक भारताचे आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले.

**प्रश्न (प्रसाद ओक) : लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचा उल्लेख केला, म्हणून उत्सुकतेने विचारतो की, नामकरणाला इतका विलंब का लागत आहे?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** त्यामध्ये पुष्कळ प्रोसेस आहेत. मध्यंतरी कुठलीच नावे द्यायची नाही असा एक निर्णय सरकारने घेतला होता, तो निर्णय आता बदलला. त्यामुळे आता त्याच्यामध्ये पहिली स्टेप असते की, राज्याने रेकमंड करायचे आणि राज्याने ते रेकमंड केलेले आहे. आता त्या ठिकाणी त्याच्यावर पुढची प्रोसेस चालू आहे. मला असे वाटते की, आता त्यामध्ये खूप विलंब होणार नाही. आपण लवकरच ‘दिबां’चे नाव देऊ शकू.

**प्रश्न (अमृता खानविलकर) : सर तुम्ही जेव्हा वर्तमान भविष्याबद्दल तेव्हा एक बळ येते. असे वाटते की हो हे पॉसिबल आहे, कारण तुम्ही ते घेऊन आणणार आहात. वाहतुकीचे खूप प्रश्न आहेत, ती कोंडी कशी दूर कराल? त्याबद्दल आपल्या काय योजना आहेत?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** खरंच आहे, आपण जर विचार केला तर एक प्रकारे उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारी ट्रॅफिक आहे. त्याच्यामुळे या पनवेलमध्ये खूप वाहतूक कोंडी होताना दिसते आणि आता जी काही दिल्ली वडोदरा कनेक्टिव्हीटी आहे. त्यामुळे आपण आता डी कन्जेक्शन करण्याचा प्रयत्न करत आहोत. विशेषतः कळंबोलीजवळ आता हे जंक्शन रिडेव्हलप करतोय मला असे वाटते की, ते एक उत्तम असे आर्टस्ट्रक्चरल मार्बल ठरेल. त्या ठिकाणी जवळपास ७५० कोटी रुपये खर्च होणार असून ट्रॅफिक सुरळीत होणार आहे. एक बोगदाही तुर्भेकडे जाणारा तयार करीत आहोत. विमानतळाला जी काही कनेक्टिव्हीटी आहे, त्याकरितादेखील दोन वेगवेगळे मार्ग हे आपण तयार केलेले आहेत. त्यामुळे पुढच्या काळामध्ये खूप मोठ्या प्रमाणात हा सगळा भाग डीकंजक्शन करणार आहोत. त्यासोबत विचार केला तर सिडकोने नवी मुंबई आणि पनवेल भागामध्ये जवळपास ५९ किलोमीटरचे मेट्रोचे नेटवर्क हातामध्ये घेतले आहे. या मेट्रोच्या नेटवर्कमुळे बेलापूरपासून जे नेटवर्क आहे ते तयार होणार होणार आहे. पेंधरपासून नवी मुंबई विमानतळापर्यंत आणि नवी मुंबई विमातळापासून आजचे जे छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ आहे तिथपर्यंत एक मेट्रो निर्माण करणार आहोत. आपण नेरूळ, उरण, पनवेल असे सर्व परिसर मेट्रोने जोडणार आहोत. कल्याण, तळोजा, पनवेल हे मेट्रोने जोडणार आहोत. उलवे-कोस्टल रोड, उरण-कोस्टल रोड अशा प्रकारे रोड तयार करत आहोत. विमानतळ जेएनपीएकडे सिमलेस कसा आणता येईल असा प्रकारचा आपला प्रयत्न आहे. दिल्ली-वडोदरा रोड आहे, त्या रोडवरूनदेखील बोगदे आणि रस्त्याच्या माध्यमातून सर्व ट्रॅफिक डायव्हर्ट करणार आहोत. त्यामुळे एकूणच विचार केला तर खूप मोठे इन्फ्रास्ट्रक्चरचे काम या पनवेलमध्ये आपण हाती घेतलेले आहे. तीन वर्षात वेगवेगळ्या टप्प्यात ही सर्व कामे पूर्ण होतील आणि मला असे वाटते की, त्यातून निश्चितपणे हा सर्व भाग आहे, ज्यातील ट्रॅफिक आपण दूर करू शकू.

**प्रश्न (प्रसाद ओक) : आता आपण बोलताना नवी मुंबई विमानतळावरून मुंबई विमानतळापर्यंत मेट्रो सुरु करणार आहेत आहेत असे सांगितले, याच्यावरून मुंबईचे विमानतळ राहणार आहे असे थोडक्यात सांगितले...**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :***

हो ते विमानतळ राहणार, हे विमानतळ राहणार आणि मुंबईत आणखी एक विमानतळ निर्माण करणार आहोत. नवी मुंबई विमानतळामुळे आपण या भागामध्ये जवळपास सहा लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था उभी करीत आहोत. त्यामुळे तुम्ही हा विचार करा एक विमानतळ काय करू शकतो. समजा आपण नैना क्षेत्राचा विचार केला, तर त्याचे क्षेत्र खूप मोठे आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात विकासाचे एक दालन उभे राहिले आहे. मुंबई सिंगल रनवेमुळे नव्याने कुठलेही लँडिंग मिळत नव्हती. त्यामुळे जवळपास एक ते दीड टक्का जीडीपी केवळ एअरपोर्ट लँडिंग नाही, म्हणून थांबला होता. तो ग्रोथ या ठिकाणी मिळणार आहे.

**प्रश्न (प्रसाद ओक) : ज्या विमानतळाचे भूमिपूजन आपण केले, त्या ठिकाणी पहिल्यांदा लँडिंग करताना काय वाटले?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** नवी मुंबई विमानतळाची घोषणा १९९०मध्ये झाली, पण ते कासवाच्या गतीने चालत होते. केंद्र सरकारच्या संबंधीत आठ परवानग्या होत्या. आठ-नऊ वर्ष त्या मिळत नव्हत्या, पण मोदीजींचे सरकार आले आणि गती मिळाली. मोदीजींची व्हिडीओ कॉन्फरन्स होती मी ती लिस्ट केली आणि ज्या दिवशी मोदीजी रिव्ह्यू घेणार होते त्या दिवशीच्या सकाळपर्यंत सात परवानग्या आल्या आणि जी आठवी परवानगी होती ती मोदीजींनी विचारले का नाही आली आणि त्यांनी लक्ष घातले व सर्व परवानग्या आल्या. सर्व अडचणी आम्ही दूर केल्या. विशेषतः पनवेल उरण भागातील गावांनी सहकार्य केले आणि म्हणूनच आपण हे करू शकलो. आमचे रामशेठ ठाकूर यांनी आम्हाला त्यामध्ये खूप सहकार्य केले. अन्यथा ते फार कठीण होते आणि त्या सहकार्याला लोक सकारात्मक होते. म्हणूनच आपण हे काम वेगाने करू शकलो.

**प्रश्न (अमृता खानविलकर) : आधी सर्व कासव चालीने चालले होते. नवी मुंबई विमानतळ, अटल सेतू, समृद्धी महामार्ग तुम्ही टाइमलाईन सांगितली आणि वेळेत पूर्ण केले. ते कसे काय साध्य केले?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** मुळात अटल सेतू आहे ती कन्सेप्ट जीआरडी टाटा यांनी १९६२मध्ये आणली. त्यांनी मुंबई नवी मुंबई अशा प्रकारे जोडता येईल असे म्हटले होते. त्यानंतर खूप प्रयत्न झाले, पण ते काही होत नव्हते. ज्या वेळी मी आलो त्या वेळी आम्ही याचे काम आता घेतले यासाठी एक वॉररूम तयार केली आणि लागणाऱ्या सर्व परवानग्या सर्व प्राधिकरणांना एका ठिकाणी बैठक घेऊन मार्गस्थ केल्या. त्यामुळे हे शक्य झाले. मी नेहमी सांगतो की, मी तयार केलेला एकही प्रोजेक्ट माझा नाही. प्रोजक्टची कल्पना कुणीतरी कधीतरी केली होती, पण माझे यातले काय आहे तर हे सगळे प्रोजेक्ट मी एक्झयूटिव्ह करून दाखवले, नुसते कागदात आणि संकल्पनेत होते प्रत्यक्षात साकार करून दाखवले.

**प्रश्न (प्रसाद ओक) : मुंबई वाशीचा टोल चारचाकी वाहनांसाठी फ्री झाला आहे. अटल सेतूचे तसे करता येणार आहे का?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** अटल सेतूचा परतावा टोलवर आधारित आहे. ठरलेला टोल न घेता २५ टक्केने टोल आकाराला जातोय आता. एकदा तो कोस्टल मार्गाने विमानतळाला जोडला गेला, तर त्या ठिकाणी वाहतूक आणखी ५० टक्क्यांनी वाढणार आहे. त्यामुळे आम्ही त्यानंतर डेट सर्विसिंग नीट करू शकतो.

**प्रश्न (प्रसाद ओक) : मुंबई आणि एमएमआर क्षेत्रात स्वयंपुनर्विकासाचा एक नवा अध्याय तुम्ही सुरू केला, त्याबद्दल सांगा आणि त्याचा फायदा येथे होईल?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** पुनर्विकासाच्या संदर्भात ३० वर्षांपूर्वीच्या ज्या इमारती आहेत त्याला आपण पुनर्विकासासाठी परवानगी देतो, कारण हे सर्व कोस्टल शहर आहेत. जुन्या इमारती आहेत आणि ३०-४० वर्षानंतरचे तंत्रज्ञान आणि इतर बाबतीत थोडासा बदल होत असतो. लोकांच्या गरजाही वाढल्या आहेत, म्हणून लोक पुनर्विकासात जातात, पण मुंबई ठाण्यात असे लक्षात आले की पुनर्विकासासाठी ते विकसक घेतात, पण १५-१५ वर्षे पुनर्विकास अडकून राहतो आणि त्यातून लोकांना खूप त्रास सहन करावा लागतो. म्हणून आम्ही मुंबईतील पहिला प्रयोग केला सेल्फ रिडेव्हल्पमेंटचा विषय आणला. सर्व परवानग्या आणि देऊन त्यामध्ये कन्सेशन आम्ही दिले. सोसायटीनेच त्या ठिकाणी ठेकेदार अपॉईंट करायचा. त्याचा असा फायदा झाला की, ६०० स्केअर फूट मध्ये राहणाऱ्याला ११००-१२०० स्केअर फूटचा फ्लॅट मिळायला लागले. त्याचे पैसे वाचले आहेत. त्याला डिपॉझिट जास्त मिळत आहेत आणि आता मुंबईत १६०० सोसायटी या सेल्फ डेव्हल्पमेंटमध्ये सहभागी झाल्या आहेत. काही पूर्ण झालेल्या आहेत. मी स्वतः त्या ठिकाणी फ्लॅटची चावी द्यायला गेलो होतो. त्या वेळी त्यांच्या चेहऱ्यावर हास्य पाहून मला अतिशय आनंद झाला. आता सगळ्या एमएमआर रिजनमध्ये सिडकोच्या क्षेत्रामध्ये आपण याची पॉलिसी तयार केली आहे. त्याची एक कमिटी तयार केली आहे. आता तो आम्ही सर्वांकडे लागू करणार आहोत आणि मला विश्वास आहे बिल्डरदेखील करतील, पण ज्यांना स्वतः करायचा आहे त्यांना हे प्रकल्प करण्यासाठी आणि आपले पैसे वाचवण्याकरिता एक संधी देत आहोत.

**प्रश्न (अमृता खानविलकर) : शहरे विस्तारतात, तेव्हा तितक्याच अधिक सोयी सुविधा तयार कराव्या लागतात. एकीकडे पोहोचायला रस्ते आणि दुसरीकडे जगायला पाणी. या भागात पाण्याचे काय नियोजन?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** पाण्याचे नियोजन तर अत्यंत महत्त्वाचे आहे आणि विशेषतः आता पनवेलसारख्या या महापालिका क्षेत्रामध्ये आपण जो काही न्हावाशेवा टप्पा ३ आहे, त्याच्या माध्यमातून जवळपास दररोज ६५ एमएलडी पाणी येथे आणणार आहोत. हेटवणेमधूनदेखील १५ एमएलडी पाणी दिले आहे. आताची गरज आहे ती भागेल, पण वाढता एरिया आणि भविष्याची गरज लक्षात घेता या क्षेत्राकरिता आणि एमएमआर रिजन आहे त्याकरिता दोन धरणे महत्त्वाची आहेत. पोशीर आणि शिलार ही धरणे कुणी करायची महापालिकेने की इतर कुणी यासाठी पैसे कोण देणार, इरिगेशन विभाग व एमएमआरडी एकमेकांकडे बोटे दाखवायचे. अशा प्रकारे अनेक वर्षे टोलवाटोलवी चालली होती, पण धरणे होत नव्हती. सहा महिन्यांपूर्वी मी फाईल मागवली, दोन्ही फाईलवर मी एक पानाची नोट लिहिली आणि सांगितले की, दोन धरणे नियोजित वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. त्यासाठी मी आदेशित केले हे काम एमएमआरडीएने हातात घ्यावे. डिपॉझिट वर्क म्हणून त्यांनी खर्च करावा. त्याला जी बँक गॅरंटी पाहिजे ती महाराष्ट्र सरकार देईल आणि त्यामधून जय ज्या महापालिकेला पाणी देऊ त्यांचा काय सहभाग असला पाहिजे ते आपण निश्चित भविष्यात ठरवू, पण काम थांबायचे नाही हा निर्णय केला. निर्णय करून नुसता थांबलो नाही, तर निविदा काढल्या, वर्कऑर्डर दिल्या, काम सुरू केले. आता तीन ते चार वर्षात ही सर्व धरणे पूर्ण होतील आणि पनवेलसारखी जी शहरे आहेत या शहराच्या २०५०पर्यंतच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटणार आहे.

मालमत्तेचा आपण विषय मांडला. खरं म्हणजे या संदर्भात ही पहिली अशी महापालिका होती जी महापालिकेने कोविडच्या काळामध्ये शास्ती करामध्ये मोठ्या प्रमाणात सूट दिली. अगदी ९० टक्क्यांपर्यंत सूट दिली. वेगवेगळ्या पद्धतीने लोकांना अपेक्षित अशा प्रकारचे टॅक्स स्ट्रक्चर महानगरपालिका करत आहे. शेवटी कर तुम्ही घेणार नाही, तर कर्मचाऱ्यांचे पगार कुठून देणार, महापालिकेचे इन्कम काय आहेत टॅक्स हा इन्कम आहे. जी घरे बांधली ते प्रिमिअम आहे, प्लॅन पास करण्यासाठी शुल्क येते. हेच महानगरपालिकेचे मेजर इन्कम असते, पण आता या ठिकाणी टॅक्सचे अतिशय रॅशनलाइजेशन केल्यानंतरदेखील मला बघायला मिळाले की, आमच्या समोर जे लढतात त्या लोकांनी एक शपथपत्र छापले आहे. खरंतर त्यांना पहिल्यांदा माहित आहे की ते निवडूनच येणार नाहीत. त्यामुळे जे निवडून येणार नाहीत ते लोकं आश्वासन देताना आम्ही तुम्हाला ताजमहल बांधून देतो, आम्ही तुम्हाला मोटारगाडी देतो असेही शपथपत्र देऊ शकतात, कारण अफेडीव्हीट द्यायला कुणाच्या बापाचे थोडे जाते. एक कागदावर छापावे लागते आणि लोकांमध्ये वाटावे लागते, पण ज्या गोष्टी या ठिकाणी आवश्यक आहेत त्या सगळ्या गोष्टी आमच्या महानगरपालिकेने मागच्या काळात केल्या, पुढच्याही काळात करू आणि टॅक्सचे रॅशनलाइजेश आम्ही करू, पण जे काही खोटे आश्वासन देतात आणि अफेडिव्हिटचा कागद छापून हे काही मते मागतायेत त्यांना पनवेलकर भुलतील असे मला बिलकुल वाटत नाही.

**प्रश्न (अमृता खानविलकर) : सर तुम्ही आता कोविडचा उल्लेख केला. खरंच कोविड काळ भयंकर होता. जगासाठी भयंकर होता. कोविडच्या काळात एकिकडे सारे बंद होते, पण तुम्ही विरोधी पक्षनेते म्हणूनही सर्वत्र फिरत होता. पनवेलला दोन वेळा भेट दिली, तेव्हा पालकत्त्वाच्या भूमिकेत होता? घरी कुणाला काळजी वाटत नव्हती?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** कोविड सुरू झाला आणि जसे लॉकडाऊन लागले तसे माझ्यातल्या नेत्याने सांगितले की हीच वेळ आहे जनतेच्या पाठीशी उभे राहण्याची आणि मी जेव्हा बाहेर पडलो तेव्हा राज्यात तत्कालीन सरकारचा नेता बाहेर पडला नव्हता, ते नंतरही बाहेर पडले नाहीत. मी बाहेर पडलो आणि अक्षरशः पायाला भिंगरी लावून प्रत्येक जिल्ह्यात गेलो. प्रत्येक जिल्ह्यातील सिव्हिल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, महापालिकेचे हॉस्पिटल तिथे जाऊन काय आहे, काय नाही याची चाचपणी केली. मला माहीत होते की तेथे जाऊन परिवर्तन आणू शकत नाही, पण कोणाचे तरी लक्ष आहे हे जर वाटले, तर प्रशासन जागे होते लोकांना नीट ट्रीटमेंट मिळते आणि म्हणून मी सगळ्या गावांमध्ये, शहरामध्ये जवळपास अडीच महिने वेगवेगळ्या पद्धतीने फिरत होतो. अगदी आयसीयूमध्ये जात होतो आणि घरच्यांना शेवटी चिंता असतेच, पण मी त्यांना सांगितले होते की, वेळ आपल्याला जनतेच्या पाठीशी उभी रहायची आहे. पनवेलमध्येही मी आलो. येथील कोविड सेंटर हॉस्पिटल असेल सगळीकडे गेलो. ईश्वराच्या कृपेने त्या काळात मला कोविड झाला नाही, मात्र त्यानंतर मी इन्चार्ज म्हणून बिहारच्या निवडणुकीमध्ये गेलो होतो. सेकण्ड व्हेव आली आणि त्यामध्ये मला कोविड झाला. तेथून मला येथे परत यावे लागले, पण आल्यानंतरही मी एक निर्णय केला होता आणि घोषणाही केली होती. जर कोविडच्या काळात सामान्य माणूस हा सरकारी रुग्णालयामध्ये अॅडमिट होतो, तर मी खासगी रुग्णालयात अॅडमिट होणार नाही आणि मीदेखील सरकारी रुग्णालयात ११ दिवस अॅडमिट होतो. तेथून बरा होऊन घरी गेलो.

**प्रश्न (प्रसाद ओक) : कोविडचा प्रश्न आला म्हणून बोलतो राग येऊ देऊ नका. तुम्हाला फेसबुक लाईव्ह नाही आवडत का?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** असे आहे की, फेसबुक लाईव्ह आणि जनता डेड अशा पद्धतीचे मला आवडत नाही. मी जनतेतही जातो आणि फेसबुकवरही लाईव्ह असतो.

**प्रश्न (अमृता खानविलकर) : सर आता बोलताना नैना प्रकल्पबद्दल उल्लेख केला, तुम्ही त्याबद्दल काय सांगाल?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** नैना प्रकल्प हा जसे सांगितले आहे तसा ५७५ स्केअर किम मध्ये होणार आहे. विमानतळ झाल्यामुळे जो इन्सफ्लोअर एरिया तयार झाला आहे त्या एरियामध्ये होणार आहे. या प्रकल्पाचा फायदा काय आहे ते बघा. मुंबईचा विस्तार होऊ शकत नाही, पण मुंबईला नवी मुंबई जोडल्यामुळे अटल सेतू आणि काही कनेक्टिव्हीटी करत आहोत. सगळ्या प्रकारची ग्रोथ कुठे होऊ शकते तर ती या नैना क्षेत्रात आणि प्लस अफोर्डेबल हौसिंग क्षेत्रात होऊ शकते. जिथे लँड लॉक असते तिथे भाव कधीच कमी होत नाही. परिवर्तन आपण या ठिकाणी करू शकतो म्हणून या नैना प्रकल्पाचे सुनियोजन पुढच्या काळात विकसित करणार आहोत.

**प्रश्न : (अमृता खानविलकर) सर अजून कुठली कामे सुरू आहेत? योजना काय असतील?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** जर आपण महापालिकेचा विचार केला तर भुयारी गटार, रस्त्यांची कामे, पिण्याच्या पाण्याची कामे, गार्डनची कामे मागच्या काळात झाली आहेत. या ठिकाणी महापालिकेच्या इमारतीचे काम सुरु आहे. आता या पनवेलमध्ये ३६० विकास चालू आहे.

**प्रश्न (प्रसाद ओक) : देवेंद्रजी अगदी काही वर्षांपूर्वी तरुणवर्ग राजकारणाकडे वेगळ्या नजरेने पहात होता, पण आपल्याकडे पाहून बऱ्याच मोठ्या प्रमाणात युवा पिढीला वाटायला लागले हे की, आपणही राजकारणात यायला हवे याकडे कशा दृष्टिकोनातून आपण बघता.**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** मी असे म्हणेन की, युवा पिढीने राजकारणात आलेच पाहिजे आपल्याला माहीत आहे लोकशाहीचे तत्व, लोकशाहीमध्ये सहभाग महत्त्वाचा आहे. तुम्ही ज्यांना निवडून देता तेच सरकार डिजर्व्ह करतो. तुम्ही जर प्रक्रियेत नसलात फक्त बोटं दाखवत असाल, तर तुम्हाला बोलायचा अधिकार नाही. म्हणून ज्याला बदल घडवायचा आहे त्याने त्या बदलाचा भाग झाला पाहिजे. मी असे म्हणेन की, तरुण पिढीचे काही ॲस्प्रिएशन आहे हे ॲस्प्रिएशन पूर्ण करायचे असतील, तर त्यांनाही राजकारण क्षेत्रात यावे लागेल. फक्त येत असताना मी एक संदेश देऊ इच्छितो की, राजकारणात यायचे असेल, तर राजकारण मिशन म्हणून या. हे धंदा-व्यवसाय म्हणून बघू नका. मिशन म्हणून आलात, तर यशस्वी व्हाल, सकारात्मक बदल करू शकाल.

**प्रश्न (प्रसाद ओक) : सर्वात तरुण मुख्यमंत्री म्हणून इतिहासात तुमची नोंद झाली आहे, पण भविष्यात लोकांनी तुम्हाला कुठल्या कामासाठी लक्षात ठेवावे असे तुम्हाला वाटते?**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** मला असे वाटते की, एक काम असे सांगता येणार नाही, खूप कामे आहेत. जलयुक्त शिवारसारखे की, ज्याने महाराष्ट्र बदलून दाखवला. इन्फ्रास्ट्रक्चरची कामे आहेत, पण काही कामे असे आहेत की अनाथांना दिलेले आरक्षण. ८०० अनाथ मुले-मुलींना सरकारच्या नोकरीमध्ये लागलेले मी पाहतो तेव्हा समाधान वाटते एक चांगले काम आपल्या हातून घडले आहे. अशी अनेक कामे आहेत, पण असे म्हणेन की, मी कुठल्या कामाकरिता लोकांनी लक्षात ठेवावे असे म्हणणार नाही, परंतु आपुलकीने लोकांनी म्हटले पाहिजे की, हा चांगला माणूस होता. त्याने काही तरी केले.

**प्रश्न (प्रसाद ओक) :** हा प्रश्न राजकीय नाही किंवा पनवेलकरांच्या पुरता मर्यादित असा नाही. थोडा वैश्विक आहे. तुमच्यावर जर जीवनपट आला, तर त्याचे नाव काय असावे आणि कुठल्या कलाकाराला तुमच्या भूमिकेत पहायला आवडेल?

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** हा फार कठीण प्रश्न विचारला तुम्ही, पण आपला देवभाऊ हे नाव मला आवडेल. माझी नक्कल भाऊ कदम करतो, पण माझी भूमिका कोण करेल हे सांगता येत नाही, कारण माझ्यासारखा वजनीपण राहावे लागेल

**प्रश्न (अमृता खानविलकर) : सर प्रसाद वजन वाढवेल...**

***उत्तर (मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस) :*** जर प्रसाद हा गुणी कलाकार वजन वाढवणार असेल, तर तर मी बिलकुल तयार आहे.

दरम्यान, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विकासकामांवर आधारित असा थेट संवाद हा एक वेगळा आणि प्रभावी प्रयोग ठरल्याची चर्चा पनवेलमध्ये सुरू आहे. नेहमीच्या राजकीय भाषणांपेक्षा दृष्टिकोन, नियोजन आणि प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून साधलेला संवाद अधिक परिणामकारक ठरल्याचे उपस्थित सोसायटी पदाधिकाऱ्यांनी सांगितले. पनवेलचा चौफेर विकास करून सर्व मूलभूत सुविधा व नागरी सेवा सक्षमपणे पुरवण्यात येतील, असा ठाम विश्वास व्यक्त करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संवादाला पूर्णविराम दिला.

## निवडक

### कारची दुचाकीला धडक; दोघे जखमी

**पनवेल :** भरधाव कारने दुचाकीला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाल्याची घटना तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी कारचालक शत्रुघ्न जयस्वाल याच्याविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मुरलीधर घुगे हे कळंबोली येथे राहतात. ते त्यांच्या दुचाकीने जात असताना त्यांनी संजय लाड याला मोटरसायकल चालवायला दिली ते शालिमार ढाब्यासमोरील रोडवर पोहचले असता कारचालकाने अचानक त्याची कार वळवल्याने कार या दोघांच्या पायावर आदळली व हे दोघे दुचाकीसह रस्त्यावर पडले. त्यांना रुग्णालयात नेले असता दोघांच्या पायाला फ्रॅक्चर झाल्याचे सांगितले.


### खांदेश्वर पोलिसांची ब्रीफिंग

**पनवेल :** महापालिका निवडणूकीच्या अनुषंगाने पनवेल विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निवडणुकीच्या अनुषंगाने ब्रीफिंग केले. नवीन पनवेल सेक्टर ५ ए येथील गुरुद्वारा येथे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निवडणुकीच्या अनुषंगाने ब्रीफिंग केले. या वेळी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, एक पोनि, आठ अधिकारी, ७४ पोलीस अमलदार, ११४ होमगार्ड असे उपस्थित होते.

### मतदान केल्यास दळणावर सवलत

**पनवेल :** मतदान करा व पिठाच्या मजुरीवर सवलत मिळवा असे आवाहन पनवेल येथील जयहिंद मसाला अँड फ्लोअर मिल तर्फे मतदारांना करण्यात आले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या योजनांद्वारे ग्राहकांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येते त्याचप्रमाणे यंदाही मतदान करा व पिठाच्या मजुरीवर सवलत मिळवा असे आवाहन त्यांनी केले आहे. ही योजना १५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२६ असून प्रति किलो २ रुपये अशी सवलत मिळणार आहे. यासाठी मार्केट यार्ड पार्किंग, वैभव हॉटेलच्या मागे, पनवेल (९७०२२४४०३३/९३२००४४०३३) येथे संपर्क साधावा, असे आवाहन जयहिंद मसाला मिलतर्फे करण्यात आले आहे.

### प्रयोगशील शेतकरी गोपाळ केणी यांचे निधन



**उरण :** चिरनेर कातळपाडा येथील प्रयोगशील शेतकरी गोपाळ सोमा केणी (वय ८४) यांचे सोमवारी (दि.१२) कातळपाडा येथे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुत्र, दोन सासुरवाशीण कन्या, नातवंडे व पंतवडे असा परिवार आहे. उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष जीवन केणी यांचे ते पिताश्री होत. कै. गोपाळ केणी हे उत्तम आचारी म्हणून ते प्रसिद्ध होते. चिरनेर-कातळपाडा रंगभूमीची सेवा करण्यात देखील त्यांचे योगदान आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी रात्री उशिरा नातेवाईक व ग्रामस्थांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळींच्या उपस्थितीत चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मतदानाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन सतर्क

## बेकायदा वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात बेकायदा वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात पोलिसांनी निवडणुकीच्या रणधुमाळीत कारवाई केली. एकाच दिवशी तळोजा आणि खारघर या दोन वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत परदेशी नागरिकांची माहिती लपविल्याप्रकरणी घर मालकांविरोधात गुन्हे नोंदवण्यात आले. परदेशी नागरिक कायदा १९४६ मधील कलम १४ (क) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे.

तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सेक्टर १० मधील पार्वती हाइट्स या इमारतीत कारवाई करण्यात आली. इमारतीतील घर क्रमांक ५०१ मध्ये ३५ आणि ४२ वर्षांचे दोन परदेशी नागरिक वास्तव्यास होते. या नागरिकांना भाडेकरू म्हणून ठेवताना घरमालकाने केंद्र सरकारच्या परदेशी नागरिकांसाठी असलेल्या संकेतस्थळावर सी-फॉर्मद्वारे नोंदणी न केल्याचे तपासात उघड झाले. त्यामुळे बेकायदा आश्रय देण्यास मदत केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तर खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही कारवाई करण्यात आली.

सेक्टर ३५ एफ मधील ड्रीम सफायर या इमारतीतील दोन सदनिका परदेशी नागरिकांना भाड्याने देण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार केलेल्या चौकशीअंती या सदनिकांमध्ये चार परदेशी नागरिक राहात असल्याचे समोर आले. येथेही घर मालकाने संबंधित नागरिकांबाबत कोणतीही माहिती पोलिसांना किंवा अधिकृत यंत्रणांना दिली नसल्याने गुन्हा दाखल करण्यात आला.

या कारवाईमुळे बेकायदा वास्तव्य करणारे परदेशी नागरिक तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या मालकांचे धाबे दणाणले आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने नवी मुंबई पोलिसांनी अशा प्रकारच्या तपासण्या अधिक तीव्र केल्या आहेत. त्या अंतर्गत कारवाई केली जात आहे.

## गावठी दारूचा अड्डा उध्वस्त

**पनवेल : वार्ताहर**



मतदान प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात अवैधरित्या देशी विदेशी दारू निर्मिती करणारा हातभट्टीचा अड्डा गुन्हे शाखा पोलीसांनी उध्वस्त केला असून चार जणांना ताब्यात घेतले आहे.

पनवेल तालुक्यातील शेलघर गाव येथील स्मशानभुमीच्या मैदानापासुन आश्रम शाळेकडील रोडच्या, डोंगरावर असलेल्या झाडांमध्ये चार संशयीत इसम हे विनापरवाना अवैधरित्या गावठी दारू निर्मिती करत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांना मिळाली. त्यानुसार त्यानुसार वपोनि पृथ्वीराज घोरपडे, पोशि ठाकुर, पोशि चव्हाण यांच्या पथकाने छापा टाकून गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, १२०० लिटर गावठी दारू, गावठी दारू तयार करण्याचे कच्चे रसायन असा एकूण एक लाख आठशे रूपये किंमतीचे मुद्देमाल तसेच ०५ लिटर गाळून तयार केलेली गावठी दारू पोलिसांनी उध्वस्त केला.

## विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकल्याने माझ्यावर बिनबुडाचे आरोप -हॅप्पी सिंग

**पनवेल : वार्ताहर**



विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकल्यामुळेच माझ्यावर बिनबुडाचे आरोप करत असल्याचे मत प्रभाग क्रमांक ११चे महायुतीचे उमेदवार हॅप्पी सिंग यांनी पत्रकारांशी चर्चा करत असताना सांगितले. पनवेल महापालिका निवडणुकीचे प्रभाग क्रमांक ११चे महायुतीचे उमेदवार हॅप्पी सिंग यांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे विरोधक त्यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

या प्रभागात हॅप्पी सिंग यांच्यासह नीलम मोहित व प्रदीप भगत हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हॅप्पी सिंग यांनी आत्तापर्यंत कामोठे वसाहतीमधील विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित केली कुस्ती स्पर्धा देशभर प्रसिद्ध झाली आहे. त्याचबरोबर समाजकारण, राजकारण या क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. या कार्याची दाखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हॅप्पी सिंग यांना प्रभाग क्रमांक ११मधून उमेदवारी दिली.

या उमेदवारीचे हॅप्पी सिंग चीज करतील असा ठाम विश्वास या विभागातील मतदारांना आहे. त्यामुळे या भागातील विविध राजकीय संघटना सामाजिक मंडळे यांनी त्यांना पाठिंबा दिला असल्याने त्यांच्यासह इतर दोन उमेदवारांचा विजयसुद्धा निश्चित मानला जात आहे.

निवडणून आल्यास कामोठे वसाहतीमध्ये सुंदर असे एक कुस्ती संकुल त्याचप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, कामोठे वसाहतीमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढणे, तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच विविध शासकीय योजना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून राबवण्याचा त्यांचा मानस आहे. प्रभाग क्रमांक ११मध्ये हॅप्पी सिंग व त्यांच्या सहकाऱ्यांचे पॅनेलचे पारडे जाड मानले जात आहे.

## लोकनेते दि.बा. पाटील यांना मान्यवरांकडून अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने पनवेल येथील महात्मा जोतिबा फुले सभागृहात लोकनेते दि.बा. पाटील यांच्या १००व्या जयंतीनिमित्त अभिवादन आणि आदरांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी आगरी समाजाचे आराध्य दैवत आणि जनसामान्यांचे नेते 'दिबा'साहेबांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून 'दिबा'साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, भाजप जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेवक जगदीश गायकर, सुमित झुंझारराव, मंडळाचे उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, सचिव बी. पी.म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय गायकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते वीरेश वाणी आणि मंगेश खुटारकर यांनी सभागृहात रेखाटलेली सुंदर रांगोळी. या कलेच्या माध्यमातून 'दिबां'च्या स्मृतींना मानवंदना देण्यात आली.



## संपादकीय

# विकासाचा मुद्दा मोलाचा

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी गेल्या आठ-दहा दिवसांपासून सुरू असलेली प्रचाराची रणधुमाळी मंगळवारी सायंकाळी थांबली. या निवडणुकीत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे. मुंबईसह राज्यभरातील सर्व महापालिकांमध्ये मतदार विकासाच्या मुद्यावर मतदान करतील अशी अपेक्षा आहे.

**राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या तोफा मंगळवारी सायंकाळी थंडावल्या. निवडणुकीच्या रणधुमाळीत सर्वच पक्षांकडून सर्व शक्ती पणाला लावून प्रचार करण्यात आला. या निवडणुकीत १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. प्रचार काळात सभा, रोड शो, पदयात्रा, महिला मेळावे, पोस्टर, बॅनर, होर्डिंग्जसोबतच समाज माध्यमांवरही प्रचाराची जोरदार मोहीम राबवण्यात आली. प्रचाराच्या अखेरच्या दिवशी नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भव्य रोड-शो आणि बाईक रॅली काढण्यात आली. जनतेच्या मनात महायुती असून ती सर्व २९ महापालिकांमध्ये प्रचंड मतांनी निवडून येईल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनी अनेक ठिकाणी प्रभागांमध्ये रॅली आणि रोड-शोद्वारे मतदारांशी थेट संवाद साधला. आपले चिन्ह, आपल्या उमेदवाराचे नाव मतदारांच्या मनावर ठसवण्यासाठी कार्यकर्ते प्रयत्नशील होते. शेवटच्या दिवसापर्यंत प्रचारात सगळीकडे घोषणांचा पाऊस पडत राहिला. आता प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर जाहीर प्रचार म्हणजे सभा, मिरवणूक, पदयात्रा, प्रचार साहित्याचे वितरण तसेच इलेक्ट्रॉनिक व समाज माध्यमांद्वारे प्रचार करणे प्रतिबंधित असेल, मात्र उमेदवार घरोघरी जाऊन प्रचार करू शकतील. फक्त त्यांना माईकचा वापर करता येणार नाही असे राज्य निवडणूक आयोगाच्या आयुक्तांनी मंगळवारी आपल्या पत्रकार परिषदेत सांगितले. अखेरच्या दिवशी काही ठिकाणी पैशाचे वाटप सुरू असल्याच्या तक्रारी सर्वच पक्षांच्या कार्यकर्त्यांनी केल्याचे दिसले. जिथे अटीतटीच्या लढती आहेत तिथे उमेदवार विरोधी उमेदवाराच्या अपप्रचारावर भर देतानाही दिसले. या निवडणुकीत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीकडे अवघ्या देशाचे लक्ष लागले आहे. मुंबईत 'ठाकरे बंधूं'करिता ही निवडणूक अस्तित्वाची लढाई असल्याचे मत बहुतेक विश्लेषकांनी नमूद केलेले दिसून आले. त्यांनी जुनाच अस्मितेचा मुद्दा लावून धरला तर महायुतीकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील विकासकामांकडे लक्ष वेधले. मुंबई महानगरीत गेल्या काही काळात भरीव विकासकामांमुळे घडून आलेला बदल नजरेत भरण्यासारखा आहेच. राज्यभरात या निवडणुकीत अर्ज माघारी घेण्याच्या अखेरच्या दिवशी ६९ उमेदवार बिनविरोध निवडून आले. यामध्ये भाजपचे ४४ उमेदवार आहेत. विरोधकांनी सर्व पक्षांच्या बिनविरोध उमेदवारांविरोधात बरीच ओरड केल्यामुळे चौकशी अहवाल येईपर्यंत बिनविरोध उमेदवारांना विजयी जाहीर करू नका असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत. याखेरीज नेहमीप्रमाणे सर्वच पक्षांमध्ये काही प्रमाणात बंडखोरी झाल्याचेही दिसून आले. मधली काही वर्षे निवडणुकीच्या प्रतिक्षेत गेल्यानंतर अखेर आता राज्यभरातील शहरांना त्यांच्या पसंतीचे लोकप्रतिनिधी मिळणार आहेत. सर्वसाधारणपणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षाच्या बाजूने कौल मिळतो असे यापूर्वी अनेकदा दिसले आहे. नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद आणि नगरपंचायत निकालांमध्येही तसेच दिसले होते. राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपलाच या निवडणुकीतही मोठे यश मिळेल हे निश्चित आहे. दरम्यान, महापालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. एकंदर राज्यात निवडणुकांचा मौसम पुढेही सुरू राहणार आहे.**

# मतदानास नक्की या, आपले स्वागत आहे!

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६च्या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीची सज्जता नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली आहे. मतदानास सर्व पात्र मतदारांनी येऊन निर्भयतेने मतदान करावे , ग्रीन, पिंक, आणि आदर्श मतदान केंद्रासह महानगरपालिकेची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानास नक्की या आपले स्वागत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रातील २० प्रभागांमध्ये २४६ उमेदवारांसाठी ही निवडणूक बहुसदस्यीय पॅनल पद्धतीने होत असून, प्रभाग क्रमांक ११ व २० व मध्ये अ, ब, क अशा ३ जागांसाठी, तर इतर प्रभागांमध्ये अ, ब, क, ड अशा चार जागांसाठी नागरिकांना मतदान करावयाचे आहे. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यातील कामकाजाचा आयुक्तांमार्फत नियमितपणे आढावा घेतला असून प्रत्यक्ष पाहणीही करण्यात आलेली आहे. पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका भयमुक्त, निष्पक्ष व शांततेत होण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने कार्यरत रहावे अशा सूचना मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) व निवडणूक निरीक्षक मनिषा कुंभार यांच्यामार्फतही निवडणूकविषयक कार्यवाहीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ५,५४,५७८ मतदार असून त्यामध्ये २,९४,८२१ पुरुष, २,५९,६८५ महिला मतदारांचा समावेश आहे. निवडणुकीसाठी सहा विभागांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये स्थापन करण्यात आली असून त्या ठिकाणाहून निवडणूक साहित्याचे वितरण व संकलन केले जाणार आहे. निवडणुकीकरिता एकूण ६५६ मतदान केंद्र स्थापन करण्यात आली आहेत. दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.३० ते ५.३० दरम्यान मतदान होणार आहे. दिव्यांग व वृध्द नागरिकांसाठी व्यवस्था सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात येत असून मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची दक्षता घेण्यात आली आहे. त्यासाठी दिव्यांग व वृद्ध नागरिकांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली असून मदतीसाठी स्वयंसेवकही कार्यरत असणार आहेत. मतदान केंद्रांवरील कामकाजासाठी मतदान केंद्राध्यक्ष, ३ मतदान अधिकारी व शिपाई अशा एकूण ४,१२५ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांची दोन प्रशिक्षण पूर्ण झाली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्तही तैनात असणार आहे.

निवडणुकीसाठी ८९७ अधिक कंट्रोल युनिट व १,९१२ बॅलेट युनिट प्राप्त झाली असूनप्रथम स्तर तपासणीनंतर मतदान यंत्रांचे मतदान केंद्र संख्यानिहाय वितरण करून मतपत्रिका मांडणी (बॅलेट सेटिंग) व सीलबंद (सीलिंग) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सर्व मतदान यंत्रे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांतील ६ स्ट्राँग रूममध्ये कडक पोलीस बंदोबस्तात ठेवण्यात आली आहेत.सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

प्रत्येक विभागामध्ये एक महिला विशेष 'सखी मतदान केंद्र (पिंक बूथ) तसेच पर्यावरणपूरक आदर्श मतदान केंद्र (ग्रीन बूथ) उभारण्यात येत आहे. यामध्ये पिंक मतदान केंद्र कारमेल कॉन्वेट स्कूल (कळंबोली), ग्रीन मतदान केंद्र सेंट जोसेफ स्कूल (नवीन पनवेल), बाल भारती पब्लिक स्कूल येथे आदर्श मतदान केंद्र (खारघर) उभारण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. क्षेत्रीय अधिकारी व प्रशिक्षित मास्टर ट्रेनर निवडणुकीच्या कामकाजासाठी ६९ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून ते आपल्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रांवरील कामकाजावर लक्ष ठेवणार आहेत. मतदान यंत्रांसाठी प्रशिक्षित मास्टर ट्रेनरही कार्यरत असणार आहेत. पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी सज्ज ठेवण्यात आले आहेत. मतदान साहित्य वितरण व संकलनासाठी स्वतंत्र कर्मचारीवर्ग नेमण्यात आला असून मतमोजणीसाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची आठही विभागांमध्ये नेमणूक करून त्यांचे प्रशिक्षणही पूर्ण करण्यात आले आहे.

संपूर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक वाहन व्यवस्थेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे.

मतमोजणी केंद्रांची व्यवस्था सहा ठिकाणी १६ जानेवारी रोजी १० वाजल्यापासून सहा मतमोजणी केंद्रावर मतमोजणी होणार आहे. मतमोजणीकरिता संबंधित निवडणूक निर्णय कार्यालयानिहाय पुढीलप्रमाणे मतमोजणी केंद्र स्थापना करण्यात आलेली आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ कळंबोली नवीन वॉर्ड कार्यालय, विजयदुर्ग, भूखंड क्र. ६, ७ व ८, सेक्टर ८ए, कळंबोली; निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ खारघर नवीन वॉर्ड कार्यालय, सिंधुदुर्ग, भूखंड क्र. १४, सेक्टर १९, खारघर; निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३ कळंबोली प्रभाग समिती 'ब' कार्यालय, पनवेल महानगरपालिका- काळेश्वरनाथ मंगल कार्यालय, सेक्टर १ए, कळंबोली; निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ४ कामोठे नवीन वॉर्ड कार्यालय, सुवर्णदुर्ग, भूखंड क्र. १-इ, सेक्टर ११, कामोठे; निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ५ काळसेकर टेक्निकल कॅम्पस, भूखंड क्र. २ व ३, सेक्टर १६, न्यू पनवेल (धाकटा खांदाजवळ); निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ६ इंदुबाई ए. वाजेकर इंग्लिश मीडियम स्कूल, वडाळे तलावाजवळ, पनवेल.

(साभार : पनवेल महापालिका)

# तीळगूळ घ्या, गोड गोड बोला!

भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यामुळे या भारत देशात कृषी व्यवस्था व त्याच्याशी निगडित अनेक सण-समारंभ साजरे केले जातात. त्याचप्रमाणे मकरसंक्रांत हा जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाणे पौष या दहाव्या मराठी महिन्यात येणारा शेती संबंधित सण असून सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे.

या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये आलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकांना देतात. हरबरे, ऊस, बोरे, गव्हाच्या ओंब्या, तीळ अशा गोष्टी सुगडात/सुगड्यात भरून त्या देवाला अर्पण करतात. बायका उखाणे घेतात व एकमेकांना तिळगूळ घ्या, गोड गोड बोला असं म्हणतात. मकर संक्रांतीला महाराष्ट्रात नुसतेच संक्रांत म्हणतात. मकर संक्रांती (उत्तरायण/ माघी/ संक्रांती), ज्याला पश्चिम बंगालमध्ये मोकोर सोनक्रांती म्हणूनही ओळखले जाते आणि नेपाळमध्ये माघे संक्रांती, येथे 'संक्रांती' म्हणजे 'हस्तांतरण', हा दिवस सूर्याचा मकर राशीत संक्रमण दिवस मानला जातो. आता हिंदू दिनदर्शिकेमध्ये सूर्य उत्तरेकडे सरकतो. सूर्य या देवतेला समर्पित, अनेक स्थानिक बहु-दिवसीय उत्सव संपूर्ण भारतात आयोजित केले जातात. ग्रेगोरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तो दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तो पहिला दिवस आहे.

लीप वर्षांमध्ये एक दिवस जोडल्यामुळे, मकर संक्रांतीची तारीख थोडी बदलू शकते. लीप वर्षात ते १५ जानेवारीला येते, अन्यथा १४ जानेवारीला असते. मकर संक्रांती हा सामाजिक सण आहे. हा सण रंगीबेरंगी सजावट, ग्रामीण मुलांनी घरोघरी जाणे, गाणी गाणे आणि काही भागात भेटवस्तू मागणे, मेळे, नृत्य, पतंग उडवणे, शेकोटी पेटवणे आणि मेजवानी यांसारख्या सामाजिक उत्सवांनी साजरी केली जाते. इंडोलॉजिस्ट डायना एल. एक यांच्या मते मघा मेळ्याचा उल्लेख हिंदू महाकाव्य महाभारतात आहे.

अनेक निरीक्षक पवित्र नद्या किंवा तलावांवर जातात आणि सूर्याला धन्यवाद देण्यासाठी स्नान करतात. दर बारा वर्षांनी, हिंदू कुंभमेळ्यासह मकर संक्रांत पाळतात - जगातील सर्वात मोठ्या सामूहिक तीर्थक्षेत्रांपैकी एक, अंदाजे ६० ते १०० दशलक्ष लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. या कार्यक्रमात, ते सूर्याला प्रार्थना करतात आणि गंगा आणि यमुना नदीच्या प्रयागराज संगमावर स्नान करतात, ही परंपरा आदि शंकराचार्यांना दिली जाते. **(साभार : इंटरनेट)**




# यूट्यूबवर काय बघायचं 'हे' फीचर करील तुमची मदत

यूट्युब हे सर्वोत्कृष्ट व्हिडीओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. इथे एखादे गाणे ऐकणे, एखादा चित्रपट, मालिका, लहान मुलांसाठी आवडती गाणी, गोष्टी ऐकणे व पाहणे अगदी सहज सोपे जाते... यूट्यूब हे सर्वोत्कृष्ट व्हिडीओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. इथे एखादे गाणे ऐकणे, एखादा चित्रपट, मालिका, लहान मुलांसाठी आवडती गाणी, गोष्टी ऐकणे व पाहणे अगदी सहज सोपे जाते, पण कधी कधी तुम्हाला योग्य व्हिडीओ किंवा तुम्हाला पाहिजे तसा व्हिडीओ शोधण्यासाठी संघर्ष करावा लागतो, तर या स्क्रोलिंग समस्यांचा अंत करण्यासाठी, यूट्यूब नवीन 'प्ले समथिंग' फ्लोटिंग क्शन बटणाची चाचणी करीत आहे.

9to5Googleच्या अलीकडील अहवालानुसार नवीन 'Play something' बटण काळ्या पार्श्वभूमीसह आणि तळाच्या पट्टीच्या अगदी वर पांढऱ्या मजकुरासह दिसते. या बटणावर टॅप केल्याने शॉर्ट्स प्लेअरमधील एखादा व्हिडीओ प्ले होईल. हे फीचर युजर्सना त्याच्या अनुभवावर आधारित नवीन व्हिडीओही दाखवेल. उदाहरणार्थ- जर एखाद्या युजरला रोमँटिक गाणी पाहणे आवडत असेल, तर हे फीचर त्याला तसा कन्टेन्ट पोहोचवण्यात मदत करील, पण असे दिसून आले की, प्लेअरच्या तळाशी असलेल्या टाइमलाइन स्क्रबरसह स्क्रीनच्या उजव्या बाजूला दिसणाऱ्या लाइक, डीसलाइक, कमेंट्स आणि शेअर बटणासह बटण पोर्ट्रेट मोडमध्ये नियमित कन्टेन्टसुद्धा प्ले करू शकते. पण, जेव्हा मिनी प्लेअर क्टिव्ह असतो तेव्हा 'प्ले समथिंग' बटण अदृश्य होते. यूट्यूबने 'प्ले समथिंग फीचर'चा प्रयोग करण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२३मध्ये एका reddit युजर्सने काय पाहायचे ते ठरवू शकत नाही? असा मजकूर लिहिलेला बॅनर आणि Vimer 'प्ले समथिंग बटण' दिसणारा एक फोटोसुद्धा शेअर केला होता. नवीन 'Play something' बटण सर्व युजर्ससाठी केव्हा आणले जाईल हे अद्याप अस्पष्ट आहे, पण सांगितल्याप्रमाणे यूट्यूबमध्ये ते नवीन सुधारणा आणि फीचर्सचा एक समूह घेऊन येणार आहेत. त्यात प्लेलिस्टसाठी लघु प्रतिमा सेट करण्याची क्षमता (thumbnails for playlists), स्लीप टायमर सेट करणे, मिनी प्लेअर पुन्हा डिझाइन करणे आदी गोष्टी आहेत.

# भारताचे माजी अर्थमंत्री सी.डी. देशमुख



## निमित्त

भारताचे माजी अर्थमंत्री, श्रेष्ठ अर्थनीतिज्ञ व प्रथम श्रेणीचे प्रशासक चिंतामण द्वारकानाथ देशमुख यांचा जन्म कुलाबा जिल्ह्यातील नाते या गावी १४ जानेवारी १८९६ मध्ये कायस्थ प्रभू घराण्यात.झाला त्यांचे वडील वकील होते. प्राथमिक शिक्षण नाते या गावी. वयाच्या अकराव्या वर्षी पहिले बक्षीस आणि पहिली शिष्यवृत्ती मिळविली तेव्हापासून चिंतामणरावांनी कधीही पहिला क्रमांक सोडला नाही. मुंबई येथे 'आर्यन एज्युकेशन सोसायटी' च्या माध्यमिक शाळेतून ते मॅट्रिकच्या परीक्षेमध्ये प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले (१९१२). जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती मिळविण्याचा पहिला मान त्यांना लाभला. एल्फिन्स्टन महाविद्यालयातून इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ते इंग्लंडला गेले व केंब्रिजच्या 'जीझस महाविद्यालया' तून बी. ए झाले.भौतिकीच्या प्राध्यापकांच्या एका प्रतिकूल शेऱ्यामुळे देशमुखांनी तो विषय सोडून त्याऐवजी वनस्पतिविज्ञान हा विषय घेतला व या विषयातील विद्यापीठाचे बक्षीस मिळविले. आय.सी.एस परीक्षेत ते पहिले आले. पुढील काळात या परीक्षेत कोणीही भारतीय त्यांच्याइतके गुण मिळवू शकला नाही. मात्र, त्यानंतर जे घडलं, त्यात या माणसाच्या शेवटपर्यंतच्या कारकीर्दीची बिजं दिसतात.प्रथम क्रमांकानं उत्तीर्ण झालेल्या २२ वर्षीय सी. डी. देशमुख यांनी लोकमान्य टिळकांची भेट घेतली आणि सांगितलं की, सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन मला देशसेवा करायची आहे.

त्यावेळी टिळकांनी देशमुखांना सांगितलं, तुमच्या हृदयात देशाची उर्मी आहे ना? मग ती सारखी उचंबळत ठेवा. ती जागृत ठेवून तुम्ही सरकारची नोकरी करा. राज्यकारभाराचा तुमचा अनुभव स्वराज्यात फार उपयोगी पडेल. मी तुम्हाला निश्चित सांगतो की, तुमच्या आयुष्यात एक दिवस असा उगवेल, की ज्या दिवशी तुमच्या हृदयातील देशसेवेची ही उर्मी आपोआप प्रकट होईल.सी. डी. देशमुख यांची शेवटपर्यंतची म्हणजे १९८२ पर्यंतची कारकीर्द पाहिल्यास टिळकांच्या शब्द नि शब्दाला ते जागल्याचाच प्रत्यय येतो.शासकीय आणि प्रशासकीय पदांची सी. डी. देशमुख यांच्या आयुष्यात कधीच वानवा नव्हती. १९६९ साली राष्ट्रपतीपदाची निवडणूक ते पराभूत झाले. हे एक पद वगळता, सी. डी. देशमुखांनी अपयश पाहिलं नाही. आपल्या ज्ञानाच्या जोरावर ते केवळ रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर आणि पुढे केंद्रीय अर्थमंत्रीच झाले नाहीत, प्रांतासाठी राजीनामा देण्याचं धाडसही त्यांना याच ज्ञानातून आल्याचं नमूद केल्यास वावगं ठरू नये. एका प्रसंगी पंडीत जवाहरलाल नेहरू आणि सी. डी. देशमुख सोबत होते. समोर ब्रिटीश उच्चायुक्त होते. त्यावेळी सी. डी. देशमुखांची ओळख करून देताना नेहरू म्हणाले, 'India's most charming minister'.

भाषावार प्रांतरचना करताना भारत सरकारने बेळगाव व कारवार महाराष्ट्राला न दिल्याचा निषेध म्हणून चिंतामणराव देशमुखांनी अर्थमंत्रिपदाचा आणि लोकसभेचा राजीनामा दिला. त्यानंतर लगेचच जागतिक बँकेने त्यांना गव्हर्नर होण्याची विनंती केली असताना ते पद स्वीकारण्यास त्यांनी नकार दिला.त्यानंतर आचार्य अत्रे यांनी म्हटलं होतं, चिंतामण महाराष्ट्राचा 'कंठमणी' झाला. २ ऑक्टोबर १९८२ रोजी त्यांचे निधन झाले.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# थंडीत पांढरे तीळ खाल्ल्याने स्त्रियांना मिळतील फायदे

तीळ हा स्वयंपाकघरातील औषधी उपयोगाचा घटक आहे. थंडीमध्ये अंगात उष्णता, उर्जा निर्माण करणारे पदार्थ खाल्ले जातात. तीळ हे त्यापैकीच एक. हिवाळ्यात तिळाचे विविध पदार्थ करुन खाल्ले जातात .आयुर्वेददृष्ट्या तीळ शक्तीवर्धक मानले गेले आहेत. संक्रात हा सणही हिवाळ्यातच येतो आणि तो तिळगूळ तसंच गुळाच्या पोळीशिवाय काही पूर्ण होत नाही. थंडीत तीळ खाण्याचे फायदे :त्वचा चांगली राहते : ज्यांची त्वचा जास्त कोरडी पडते, त्यांनी अगदी थंडी सुरू झाली की लगेचच आपल्या आहारात तिळाचा समावेश करावा. त्यामुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. दुधामध्ये तीळ भिजवून त्याची पेस्ट करून ते चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावर नैसर्गिक चमक येते.



हाडांच्या मजबुतीसाठी : थंडीमध्ये हाडांची दुखणी वाढतात. अशा वेळी तिळाचा आहारात समावेश केला, तर त्रास खूप कमी होतो. रोजच्या जेवणात तिळाची चटणी, तिळकूटाचा वापर केल्यानं सांधेदुखी, स्नायूंची दुखणी कमी होतात.

रक्तदाब नियंत्रणात : ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे त्या महिलांनी आहारात तिळाचा समावेश केलाच पाहिजे. तिळामध्ये मॅग्नेशियम भरपूर असतं. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होते. अर्थात डॉक्टरांचा सल्ला घेऊनच तीळ योग्य प्रमाणात खाल्ले जावेत.

कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी : तीळ आपल्या हृदयाच्या आरोग्यासाठीही खूप चांगले आहेत. त्यामुळे थंडीत तर तिळाचा वापर आपल्या रोजच्या जेवणात केलाच पाहिजे. ज्या स्त्रियांचे कोलेस्ट्रॉल वाढलेले आहे, त्यांच्यासाठी तीळ खाणं फायदेशीर आहे.

चांगल्या झोपेसाठी : अनेक स्त्रियांना थंडीमध्ये झोप न लागण्याचा त्रास होतो. तिळाचा आहारात समावेश केला तर झोप न येण्याची समस्या दूर होऊ शकते असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर तिळाच्या सेवनाने तणाव आणि डिप्रेशन कमी होण्यासही मदत होते.

दातांसाठी उपयुक्त : सकाळी ब्रश केल्यानंतर तीळ चावून खाल्ल्याने दात मजबूत होतात. हिरड्यांमधून होणाऱ्या रक्तस्त्रावावरही तीळ गुणकारी आहेत. सतत तोंड येण्याचा त्रास होत असेल तर तिळाच्या तेलात सैंधव मीठ मिसळून ते लावल्यानं आराम पडू शकतो.

# श्रीवर्धनमध्ये सार्वजनिक शौचालयांचा बोजवारा

## दोन वर्षांपासून सुलभ शौचालये कुलूपबंद

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

पर्यटनासाठी राज्यभरात ओळख असलेल्या श्रीवर्धन शहरात मूलभूत सुविधांची अवस्था अत्यंत चिंताजनक बनली असून, नगरपरिषदेच्या अखत्यारित येणारी सार्वजनिक सुलभ शौचालये व स्नानगृहे तब्बल दोन वर्षांपासून बंद अवस्थेत असल्याने पर्यटकांसह स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये श्रीवर्धन नगरपरिषदेच्या वतीने मठाचा गवंड आणि शासकीय विश्रामगृह परिसरात समुद्रकिनाऱ्यालगत सार्वजनिक शौचालये, स्नानगृहे व कपडे बदलण्यासाठी स्वतंत्र खोल्यांची सुविधा अल्प शुल्कात उपलब्ध करून देण्यात आली होती. समुद्रस्नानासाठी येणाऱ्या हजारो पर्यटकांना ही सुविधा उपयुक्त ठरत होती. मात्र सदर सुविधा कंत्राटी पद्धतीने चालवण्यासाठी इच्छुक कंत्राटदार मिळत नसल्याने मठाचा गवंड येथील सुलभ शौचालय व स्नानगृह मागील दोन वर्षांपासून पूर्णतः बंद आहेत.

सध्या वापरात नसलेल्या या सार्वजनिक इमारतींची अवस्था विदारक झाली आहे. पर्यटकांकडून उरलेले खाद्यपदार्थ, प्लास्टिक कचरा, रिकाम्या मद्याच्या बाटल्या टाकल्या जात असून शौचालयाची इमारत अक्षरशः कचरा पेटीमध्ये रूपांतरित झाली आहे. याशिवाय काही समाजकंटकांकडून बेसिन, शौचालये, स्नानगृहांचे दरवाजे व आतील साहित्याची तोडफोड करण्यात आल्याचेही आढळून येते. ठिकठिकाणी अंतर्वस्त्रे, दारूच्या बाटल्या व दुर्गंधीमुळे परिसरातील वातावरण अस्वच्छ व विद्रूप बनले आहे.

समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होत असताना अशा मूलभूत सुविधांचा अभाव विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग आणि शालेय सहलीवर आलेल्या विद्यार्थिनींसाठी गंभीर समस्या ठरत आहे. नैसर्गिक विधीसाठी सुरक्षित व स्वच्छ शौचालय उपलब्ध नसल्याने पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून याबाबत अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

पर्यटनावर अवलंबून असलेल्या श्रीवर्धनसारख्या शहरात स्वच्छता व मूलभूत सुविधा या अत्यंत महत्त्वाच्या बाबी असताना नगरपरिषदेकडून याकडे होत असलेले दुर्लक्ष चिंताजनक आहे. बंद अवस्थेत असलेली सुलभ शौचालये तातडीने सुरू करणे, कंत्राटदार मिळवण्यासाठी व्यवहार्य धोरण आखणे तसेच मोडकळीस आलेल्या सुविधांची दुरुस्ती व देखभाल करणे गरजेचे बनले आहे. अन्यथा 'पर्यटन नगरी' अशी ओळख असलेल्या श्रीवर्धनच्या प्रतिमेला मोठा धक्का बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## रायगडात समृद्ध पंचायतराज अभियानात ९० कोटींची घरपट्टी वसुली

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान राबविण्यात येत आहे. अभियानाच्या पहिल्या टप्प्यात सप्टेंबर ते डिसेंबर २०२५मध्ये ग्रामपंचायतींची तब्बल ९० कोटी ७७ लाखांची वसुली आहे.

रायगड जिल्ह्यात शासनाच्या समृद्ध पंचायत राज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची घरपट्टीची मोठी थकबाकी राहिल्याने या अभियानांतर्गत थकबाकी भरणासाठी ग्रामपंचायतींतर्फे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायतींना सोमवारी व शनिवारी असे दोन दिवस घरपट्टी भरणासाठी कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. या विशेष कॅम्पचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेउन अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला.

अभियान कालावधीतच १३ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या लोकअदालतीमुळे अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून घरपट्टीची एकूण २७ हजार ३४१ प्रकरणे ठेवण्यात आली. यातील ८ हजार ३१६ प्रकरणांचा निपटारा करून ६ कोटी ८० लाख १४ हजार ९६३ रुपयांची घरपट्टी वसूल करण्यात आली. त्याचप्रमाणे लोकअदालती मध्ये पाणीपट्टीची सहा हजार ६८९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यातील १ हजार ४७४ प्रकरणांचा निपटारा झाला.

## 'एसबीआय'चा राजिपशी कर्मचारी पगार खात्यासंदर्भात करार

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय). या बँकेकडून रायगड जिल्हा परिषदेच्यात (राजिप ) कर्मचारी वेतन खाते संदर्भात सोमवारी (दि. १२) राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या करारामुळे.खातेधारकांना मोफत वैयक्तिक अपघात विमा मिळतो. ज्यामध्ये एक कोटी १० लाख रुपयांपासून कमाल दोन कोटी ६० लाखांपर्यंत विमा संरक्षण उपलब्ध आहे.



एसबीआय बँकेतर्फे राज्य शासन वेतन खाते योजनेतून रायगड जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांना विशेष लाभ देण्यात येणार आहे. यामध्ये स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये पगार खाते शून्य शिल्लक ठेवून उघडले जाते. खातेधारकांना मोफत वैयक्तिक अपघात विमा मिळतो. ज्यामध्ये १ कोटी १० लाख रुपयांपासून कमाल २ कोटी ६० लाखांपर्यंत विमा संरक्षण उपलब्ध आहे. तसेच यात मोफत हवाई अपघात विम्याचा लाभदेखील दिला जातो. कायमस्वरूपी अंशतः अपंगत्व आल्यास अपंगत्व टक्केवारीनुसार ८० लाखांपर्यंत व कायमस्वरूपी पूर्ण अपंगत्व आल्यास १ कोटी, त्याचप्रमाणे सवलतीच्या दरात आरोग्य विमा ५५ लाखांपर्यंत मिळतो. यामध्ये पगार खातेधारकासह जोडीदार, दोन अपत्यांचा समावेश आहे.

ग्राहक एसबीआय बँकेच्या कोणत्याही एटीएममधून मोफत पैसे काढू शकतात. तसेच ग्राहकांना कार लोन, होम लोन, पर्सनल लोनवर अतिरिक्त फायदेदेखील मिळतात. एसबीआयच्या योजनेनुसार बँक खात्यात १ लाख रुपयांपेक्षा जास्त मासिक पगार असलेले लोक बँकेत प्लॅटिनम सॅलरी खाते उघडू शकतात. ५० हजार ते १ लाख रुपये मासिक पगार असलेले डायमंड, २५ हजार ते ५० हजार रुपये पगार असलेले गोल्ड खाते आणि १० हजार ते २५ हजार रुपये पगार असलेले सिल्व्हर खाते आणि २ लाखपेक्षा पगार खात्यात जमा होणारे रोडियम खाते उघडू शकतात. याचा फायदा जिल्हा परिषदेच्या कर्मचारी, अधिका-यांना होणार आहे.त्यामुळे याबाबतचा करार सोमवारी करण्यात आला. राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी एसबीआयच्या या उपक्रमाचे कौतुक केले.या कराराच्या वेळी राजिपचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहूल कदम, सामान्य प्रशासन विभागाचे उपस्थित होते.

## माणगावच्या टिकमभाई मेथा वाणिज्य महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर

**माणगाव : प्रतिनिधी**

जे.बी.सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा वाणिज्य महाविद्यालया माणगावमध्ये राष्ट्रीय युवा दिन,स्वामी विवेकानंद जयंती आणि राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ रोजी कायदेविषयक शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.सदरचे शिबीर उत्साहात संपन्न झाले.



या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा न्यायाधीश वर्ग एक अतिरिक्त सत्र न्यायाधीश संजीव भालेराव उपस्थित होते. त्यांनी आपल्या वक्तव्यातून राष्ट्रीय युवा दिनानिमित्त वेगवेगळ्या कायद्याविषयी माहिती देवून विविध उदाहरणांच्या माध्यमातून उपस्थित सर्व युवांच्या जीवनावर प्रकाश टाकला. त्याचप्रमाणे सदस्य अधिवक्ता अँड. रोशन पांढरे यांनी रस्ते वाहतूक,मतदान तसेच युवकांसाठी असणाऱ्या विविध कायद्यांची माहिती देताना स्वामी विवेकानंद यांच्या कार्यातून युवकांसाठीची प्रेरणा आणि आजचा युवक यांची सांगड घालून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटी माणगावचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत,माणगाव वकील संघटना अध्यक्ष मोहन मेथा,वकील संघटनेचे उपाध्यक्ष पुंडलिक तुकाराम मालोरे,अँड.सुजित मेहताविद्यार्थी उपस्थित होते.

# विकसित भारत ग्रामीण रोजगार व आजीविका मिशनमधून रोजगाराची हमी -खासदार धैर्यशील पाटील

**पेण : प्रतिनिधी**

विकसित भारत ग्रामीण रोजगार व आजीविका मिशन या योजनेतून केंद्र शासनाच्या वतीने अकुशल बेरोजगारांना रोजगाराची हमी देण्याचे काम करण्यात येत असून या योजनेचा जास्तीत जास्त लाभ लाभार्थींनी घ्यावा असे आवाहन खासदार धैर्यशील पाटील यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केले.



या पत्रकार परिषदेस बाजार समिती सभापती महादेव मानकर, उपसभापती नितीन पाटील, रघुनाथ (बापू) दळवी, वाशी सरपंच संदेश ठाकूर, मसद सरपंच हरिश्चंद्र पाटील, प्रफुल्ल म्हात्रे आदींसह भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी योजनेची माहिती देताना खासदार धैर्यशिल पाटील यांनी संगितले कि,पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हि योजना राबविण्यात येत असून प्रत्येक गरीब व्यक्तीला रोजगार मिळावा आणि त्याच्या कामाचा सन्मान व्हावा या हेतूने आदिवासी आणि मागास, गरीब घटकांना रोजगार मिळावा यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे. विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय दृष्टीकोनानुसार ग्रामीण विकासाचा नवा आराखडा तयार करण्यात आला आहे. या योजनेत रोजगार हमीची वैधता वाढवली असून या कायद्यान्वये पात्र व्यक्तींना आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. पेरणी व कापणीच्या हंगामात शेतक-यांना आवश्यक त्या प्रमाणात मजूर उपलब्ध व्हावेत यासाठी या कायद्यात राज्यांना एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त ६० दिवसाचा विश्रांती कालावधी देण्याचा अधिकार देण्यात येऊन शेतक-यांच्या फायद्याचा विचार करण्यात आला आहे. या योजनेत पाणी योजना संदर्भातील कामे, ग्रामीण आगातील पायाभूत सुविधा, उपजिविकेशी संबंधीत पायाभूत सुविधा, प्रतिकुल हवामान आणि नैसर्गिक आपत्ती यातून होणारे नुकसान टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या कामांचा समावेश आहे. 'मनरेगा' च्या अंमलबजावणीत तंत्रज्ञानाचा वापर सक्तीचा नव्हता. परंतु या योजनेत तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य करण्यात आला असून मजुरांसाठी बायोमेट्रीक प्रणालीद्वारे हजेरी, जीओ टॅगिंग आणि सॅटेलाईट द्वारे फोटो घेण्याचा तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल या माध्यमातून खोटी नोंदणी रोखण्यासाठी उपलब्ध तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. योजनेत काम करणा-या मजूरांना आठवड्याला वेतन देण्यात येणार आहे. हे वेतन देण्यास विलंब झाल्यास त्याबद्दलची भरपाई मजुरांना आपोआप मिळेल, अशी तरतुद कायद्यात करण्यात आली आहे. २००५ मध्ये आमच्या गरजा वेगळ्या होत्या, आज वेगळ्या आहेत म्हणूनच या ग्रामीण रोजगार योजनेचे २०२५ च्या गरजांनुसार पुनर्रचना करण्यात आली असल्याचे खासदार धैर्यशील पाटील यांनी शेवटी संगितले.

## डॉ.आंबेडकर विद्यापीठात आविष्कार संशोधन स्पर्धा

**माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ लोणेरे येथे चार प्रमुख कार्यक्रम सुरु केलेले आहेत. आविष्कार ही राज्यस्तरीय आंतर-विद्यापीठ संशोधन स्पर्धा आहे जी त्यापैकी सर्वात प्रतिष्ठित आहे.

कुलपती कार्यालयाकडून दरवर्षी आविष्कार आयोजित करण्याचे उद्दिष्ट विविध विद्यापीठांमधील तरुणांना संशोधन वृत्ती समजून घेण्यासाठी आणि वैज्ञानिक ज्ञान आत्मसात करण्यासाठी एक विचारमंच प्रदान करणे हे आहे, ज्यामुळे राज्य आणि मानवाच्या विकासासाठी परिवर्तन घडून येईल.

ह्या स्पर्धेत मानवता भाषा आणि ललित कला, शेती आणि पशुपालन, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान, शुद्ध विज्ञान, औषध आणि औषधनिर्माणशास्त्र इत्यादी विषयात महाराष्ट्रातील ४८ सर्वश्रेष्ठ संशोधक निवडण्यात आले आहेत. यामध्ये पदवीपूर्वचे १८, पदव्युत्तर चे १८ आणि पीएचडी याचे १२ संशोधक शामिल आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातुन आलेले २००च्या वर संशोधक सहभागी झाले होते.



## पान १ वरुन

### पनवेल मनपा स्मार्ट बनवणार -आमदार प्रशांत ठाकूर

पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस भूमिका मांडत पनवेलच्या जनतेला मोठा दिलासा दिला आहे. त्यांनी पनवेलच्या पाण्याचा कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टिकोनातून नियोजन केले आहे. त्यामुळे आता पनवेलकरांना मुबलक आणि नियमित पाणी मिळणार आहे तसेच त्याचा खर्चाचा भार महापालिकेवर नसेल. पायाभूत सुविधा, तिसरी मुंबई, पुनर्विकास, प्रकल्प विकासावर भर दिल्याने देवेंद्रजींचे मी आभार मानतो. विरोधकांच्या जाहीरनाम्यात विकासावर भर न देता टीकांशिवाय काहीही नाही. आम्ही ६५ टक्के टॅक्स माफ करू, असे सांगतात. त्या अनुषंगाने ज्यांना निवडून यायचे नसते ते काहीही आश्वासन देऊ शकतात, असे सडेतोड उत्तर मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना दिले आहे. त्याचा उल्लेखही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी केला.

जे.एम. म्हात्रेसाहेब, प्रितम म्हात्रे पक्षात आले. त्या आधीही नगरसेवक. पदाधिकारी आले. आता शेकापने विचार केला पाहिजे पक्ष का सोडत आहेत, कारण आता विरोधकांना जनाधार राहिला नाही. १२९ अ च्या बाबतीत उल्लेख केला गेला आहे आणि असे सांगितले जाते की, गावठाण हद्दीतील २२९८३ मालमत्तांना त्याचा फायदा मिळाला. मुळातच आम्ही जर १२९ अ लावण्याच्या विरोधात असतो, तर २२९८३ मालमत्तांना त्याचा फायदा मिळाला असता का याचा विचारही विरोधकांनी केला पाहिजे. १२९ अ च्या आधारे त्यांना टॅक्स एकाचवेळी न लागता टप्प्याटप्प्याने लागत गेला. त्यामुळे १२९ अ चा फायदा मिळतोय याचा आम्हाला आनंद आहे. आम्ही तर ५० टक्के टॅक्स कमी करा असा ठराव आणला आणि मांडलाही त्या ठरावाला पाठिंबा दिला गेला. आज ज्यांची एका वार्डपुरती लढाई सुरू आहे त्या विरोधकांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांच्यामुळे टॅक्स माफ झाली सांगितले. त्याच पत्रकार परिषदेत नगरविकास सचिव गोविंदराजन यांचा कोट केला. मग ज्या वेळी गोविंदराजन यांच्यासोबत बैठक झाली त्यावेळी १२९ अ लागू झाला पाहिजे, असे सूतोवाच आणि आग्रह का केला नाही, असा सवाल उपस्थित करून निवडणूक आल्यावर फक्त मतांसाठी लोकांची दिशाभूल करण्याचा केविलवाणा प्रयत्न विरोधक करत असल्याचा मुद्दा मांडत विरोधकांच्या टॅक्सबाबतच्या संशयात्मक भूमिकेची आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलखोल केली.

जेव्हा पायाखालची वाळू सरकते त्या वेळेला वल्गना सुरू होतात. त्यामुळे विरोधकांनी निवडणुकीपुरते निवडलेले खेळणे करून ठेवले आहे. १५ तारखेपर्यंत खुळखुळ्याप्रमाणे वाजवतील आणि नंतर १६ तारखेला ईव्हीएमच्या नावाने गळा काढतील, असा सणसणीत टोलाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी विरोधकांना लगावला. आपल्या भागात एज्यु-सिटी, इनोव्हेशन सिटी, स्पोर्ट्स सिटी आणि मेडि-सिटी विकसित केली जाणार आहे. त्याचा फायदा येथील नागरिकांना विद्यार्थ्यांना झाला पाहिजे यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. विविध योजना, प्रकल्प या भागात येत असताना त्याचा फायदा जास्तीत जास्त नागरिकांना होण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. आम्ही टीका-टिप्पणीवर भर देत नाही, तर पनवेल महापालिकेच्या आणि जनतेच्या विकासावर भर देत आहोत, असेही त्यांनी नमूद केले.

या वेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी भाजप महायुतीचे ६६ प्लस उमेदवार विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला. त्यांनी निवडणुकीत प्रचारासाठी सहभागी झालेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, सुरेश गोपी, राज्यातील मंत्री पंकजा मुंडे,आदिती तटकरे, शिवेंद्रराजे भोसले, शंभूराज देसाई, खासदार श्रीरंग बारणे, आमदार गोपीचंद पडळकर, महेंद्र थोरवे, महेश शिंदे, शहाजीबापू पाटील आणि महायुतीचे सर्व पदाधिकारी आणि नागरिकांचे आभार मानले.

### लोकनेते दि.बा. पाटील यांचे कार्य अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील

शिबिरामध्ये नागरिकांसाठी जनरल चेकअप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, हाडांचे विकार, शंकरा आय हॉस्पिटलतर्फे नेत्र तपासणी, कान-नाक-घसा तपासणी अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे रक्तदान शिबिरही झाले. परिसरातील नागरिकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, जितेंद्र म्हात्रे, नंदराज मुंगाजी, भाजप पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, गजानन पाटील, सुभाषशेठ म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि २७ गाव संघर्ष समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

।।अविश्रमो लोकतंत्राधिकारा।।

KMC

**खोपोली नगरपरिषद**

खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३.
फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११
Email ID :- cokmckhpoli@gmail.com

जा.क्र.केएमसी/दवाखाना/४०५ दिनांक :- १३/०१/२०२६

**मानद वैद्यकीय अधिकारी पदासाठी जाहिरात**

खोपोली नगरपरिषद डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाकरिता तात्पुरत्या स्वरूपात करार पद्धतीने मानद वैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा पुरविणे करिता नोंदणीकृत सेवाभावी वैद्यकीय संस्था, रुग्णालय अथवा इच्छुक उमेदवारांकडून थेट मूलाखतीने मानधन तत्वावर वैद्यकीय अधिकारी ३ ते ४ महिन्याच्या कालावधीच्या नेमणुकीसाठी तीन (३) पदांकरीता मुलाखती घेवून नवीन नियुक्ती देण्यात येईल.

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | संख्या | मानधन प्रतिमहा र.रु. | कर्तव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| १ | एम.बी.बी.एस. (MBBS) | ३ | ४२,०००/- | ८ तास शिफ्ट ड्यूटी व वैद्यकीय अधिकारी सुचवतील ती कामे |
| २ | बी.ए.एम.एस. (BAMS) | | ३२,०००/- | ८ तास शिफ्ट ड्यूटी व वैद्यकीय अधिकारी सुचवतील ती कामे |

वरील नमूद शैक्षणिक पात्रता धारक इच्छुक उमेदवारांनी दिनांक १९/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता थेट मुलाखतीसाठी हजर राहणेबाबत सूचित करीत आहे.

मुलाखतीसाठी हजर राहणाऱ्या उमेदवारांनी शैक्षणिक कागदपत्रांची मूळ प्रत व दोन छायांकित प्रतीच्या संचासह दिनांक १९/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता खोपोली नगरपरिषद नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, (गुडलक चौक, वासरंग रोड) या ठिकाणी उपस्थित राहावे.

ज्या उमेदवारांची मूलाखतीने निवड होईल त्यांना नगरपरिषदेने ठरवून दिलेल्या अटी-शर्तीनुसार रक्कम रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.

सही/-
**डॉ. संगिता ठाकूर**
**वैद्यकीय अधिकारी**
**खोपोली नगरपरिषद**

# पनवेलमध्ये महायुतीची भव्य बाईक रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका निवडणुक अंतिम टप्प्यात आहेत. त्यानुसार भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय माहयुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्त महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष हाजी अरफात शेख आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी भव्य बाईक रॅली काढण्यात आली होती.

या वेळी महायुतीचे प्रभाग क्रमांक १४चे उमेदवार इकबाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील, रेणुका मयुरेश नेतकर, प्रभाग क्रमांक १९ चे उमेदवार सुमित झुंझारराव यांच्यासह इतर उमेदवारांचा जोरदार शक्तीप्रदर्शन करत प्रचार करण्यात आला. प्रचारा दरम्यान दिवंगत लोकनेते दि.बा. पाटील यांच्या निवासस्थानी जाऊन महाराष्ट्र अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष हाजी अरफात शेख आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, माजी नगरसेवक मुकित काजी, प्रभाग क्रमांक १९ चे उमेदवार सुमित झुंजाराव, प्रीतम म्हात्रे, अकबर सय्यद, केदार भगत, यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.





# कामोठे विद्यालयात 'दिबां'ची जयंती



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात प्रकल्पग्रस्तांचे कैवारी लोकनेते दि.बा.पाटील साहेब यांची जयंती साजरी करण्यात आली.

या जयंती कार्यक्रमावेळी विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, स्कूल कमिटी सदस्य दशरथ म्हात्रे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भगवान गोवारी, सदस्य शैलेश गोवारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे उपस्थित होते. दि.बा.पाटील साहेबांचे बालपण, शिक्षण व त्यांची आंदोलन याची माहिती स्वराली म्हात्रे, वीर पावणेकर, ग्रीष्मा भगत, मयुरी वाघमारे, प्रियल मदने, किंजल हादवे या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून सांगितली. तसेच १०वी क मधील विद्यार्थ्यांनी दि. बा.पाटील साहेबाच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केला.

विद्यालयातील पाटील डी. डी. मॅडम यांनी दि.बा. पाटलांच्या कार्याची माहिती सांगितली. विद्यालयाचे माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी मात्रे यांनी दि.बा. पाटील यांच्या सामाजिक लढ्याची माहिती सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रावणी रणनवरे, शर्वरी शेंडगे आभार भक्ती ननावरे हिने मानले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन दहावी क चे वर्गशिक्षक ए.पी. पाटील यांनी केले.

# खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि.१३) रसायनशास्त्र विभाग व केलई महाविद्यालय कळंबोली या संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.



या करारासाठी केलई महाविद्यालयातील रसायनशास्त्राचे विभागाचे प्रमुख व प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान-संसाधनाची देवाण-घेवाण होईल अशी हमी देण्यात आली. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच व प्रशिक्षण देण्यात येईल.

या सामंजस्य करारासाठी प्रा. डॉ. नीलम लोहकरे रसायनशास्त्र विभाग प्रमुख, विभागातील इतर सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

## सहकार भारती पनवेल महानगर जिल्ह्यातर्फे

# संवाद सहकाराचा कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सहकार क्षेत्रात काम करणारे लेखा परीक्षक, कायदा तज्ञ हे शासन आणि सहकारी संस्था यांच्यातील दुवा असून ते संस्थांचे भवितव्य घडवितात म्हणूनच म्हणूनच या दोन्ही घटकांनी जबाबदारीने कार्य करायला हवे असे आवाहन सहकार भारती प्रदेश लेखा परीक्षक प्रकोष्टप्रमुख विजय शेलार यांनी केले सहकार्य भारतीय पनवेल महानगरच्या वतीने सहकार भारती स्थापना दिनानिमित्त संवाद सहकाराचा या कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते.

सहकार क्षेत्राला बळकटी देऊन सहकार चळवळ विस्तारण्याकरिता कार्यरत असलेल्या सहकार भारतीचा ११ जानेवारी हा दिवस देशभरात स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने सहकार भारती पनवेल महानगर जिल्ह्याच्या वतीने सहकार क्षेत्रात कार्य करणाऱ्या लेखापरीक्षक कायदा तज्ञ आणि पत्रकार यांच्याकरिता संवाद सहकाराचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी प्रदेश सहसंघटन प्रमुख प्रवीण मुलाखत, कोकण प्रांत संघटन प्रमुख राजू ठाणगे, शंकरा आय हॉस्पिटलचे डॉ. राजेश कापसे यांचीही भाषणे झाली. मान्यवरांचे स्वागत पनवेल महानगर जिल्ह्याचे अध्यक्ष त्रिवेणी सालकर यांनी केले. गणपत राठोड यांनी सहकार गीत सादर केले.

१४ फेब्रुवारी २०२६ रोजी सहकारी गृहनिर्माण सोसायटीचे पदाधिकारी व सभासद यांच्याकरिता आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण शिबिर तसेच आदर्श गृहनिर्माण सोसायटी स्पर्धा याबाबतची माहिती पनवेल महानगर जिल्हा संघटन प्रमुख संतोष पोकळे यांनी दिली.

सूत्रसंचालन अपर्णा नाडगौडी यांनी केले. या वेळी किरण शिंदे, स्वप्ना साखरे, संजय पावसकर सुधीर नाडगौडी, ॲड. किशोर टोम्पे, किरण चंदने, स्मिता शेडगे दीपक शेडगे आदींचे सहकार्य लाभले. सहकार स्थापना दिन रत्नाकर कुलकर्णी यांनी गुलाब पुष्प देऊन साजरा करण्यात आला.

# शासकीय रेखाकला परीक्षेत एमएनएम विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य कला संचनालय अंतर्गत राज्य शिक्षण मंडळाद्वारे सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला (रेखाटन) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एम एन एम विद्यालयाचा १०० टक्के निकाल लागला आहे.

चित्रकलेच्या एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेसाठी एकूण ३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उज्वल यशाबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या चित्रकला परीक्षेतील यशाबद्दल कौतुक करत शुभेच्छा दिल्या. शाळेचे सहाय्यक शिक्षक परेश पावस्कर यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी जादा तासिका घेऊन विशेष परिश्रम घेतले.



**पनवेल : प्रकल्पग्रस्तांचे झुंजार लोकनेते दि.बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या संग्राम निवासस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप नेते प्रितम म्हात्रे, गणेश कडू, शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, जितेंद्र म्हात्रे, मयुरेश नेतकर, सतीश पाटील, प्रीती जॉर्ज, अरुणा दाबणे, रेणुका नेतकर, प्रियंका कांडपिळे आदींनी अभिवादन केले.**



**उरण : लोकनेते दि.बा. पाटील यांच्या १००व्या जयंतीनिमित्त लोकनेते दि.बा. पाटील टॅक्सी युनियनतर्फे अभिवादन करण्यात आले. या वेळी 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, कामगार नेते सुरेश पाटील, राजन घरत, नामदेव ठाकूर, दिलबाग सिंग, गोपीशेठ म्हात्रे, दत्ता झांजाट आदी.**

# मनपा मतदानासाठी सुटीचे आदेश जारी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशात लोकशाही व्यवस्था दृढ राहण्यासाठी १८ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व नागरिकांना निवडणुकीत मतदानाचा हक्क असून तो बजावता यावा यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाच्या ६ जानेवारी २०२६ च्या अधिसुचनेनूसार दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदानासाठी राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे, सार्वजनिक उपक्रम, बँका मधील कार्यरत कर्मचाऱ्यांना सुटी लागू राहील.

निवडणुकीत सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरीत्या बजावता यावा, यासाठी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागामार्फत स्वतंत्र शासन परिपत्रक काढण्यात आले आहे. या परिपत्रकानूसार ही सुटी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागांतर्गत येणाऱ्या उद्योग, कारखाने, दुकाने, आस्थापना, खासगी कंपन्या, निवासी हॉटेल्स, खाद्यगृहे, व्यापारी व औद्योगिक उपक्रम तसेच आयटी कंपन्या, मॉल्स, शॉपिंग सेंटर्स, रिटेलर्स आदी सर्व आस्थापनांना हे आदेश लागू राहतील.

अत्यावश्यक सेवा किंवा अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची रजा देणे शक्य नसल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांना मतदानासाठी दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे आस्थापना मालकांवर बंधनकारक राहील.

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी (सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३०) मतदान आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व आस्थापना व मतदार यांना परिपत्रकाद्वारे सुटी संबधी जाहिर आवाहन केले आहे.

# पनवेलमधील दाक्षिणात्य समाजाचा भाजप महायुतीला भक्कम पाठिंबा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अण्णा बहार का नाही, अण्णां ओर अण्णांके दाक्षिणात्य समाज के सभी नागरीक कर्मभूमी से ऋणी पनवेलकर हे या भावनेतून पनवेलमधील दाक्षिणात्य समाजाने एकसंघ होत भाजप महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला. दाक्षिणात्य समाजाचे संवेदनशील व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेले माजी स्थायी समिती अध्यक्ष व माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नवीन पनवेल येथील भव्य मैदानात प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते.



प्रभाग १४ ते २० मधील दाक्षिणात्य समाज मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहून आपला विश्वास व्यक्त केला. या वेळी अनेक मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वसमावेशक विकासकार्याचे मनापासून कौतुक केले. माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी पनवेल नगर परिषद ते महापालिका हा आधुनिक प्रवास संघर्षमय पण अभ्यासपूर्ण असल्याचे सांगितले. प्रभाग १६ ला पहिला महापौर देण्याचा मान मिळाल्याबद्दल त्यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले.

संतोष शेट्टी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ग्लोबल व्हिजनमुळे सर्व धर्म व समाजाला सुरक्षितता मिळाली आहे. गरीब, गरजू आणि होतकरू व्यक्तींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे. दक्षिण भारतातून आलेला मी गेली १८ वर्षे पनवेलची सेवा करत असून आज ही भूमी माझी कर्मभूमी असल्याचा मला अभिमान आहे. माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महायुती सरकारच्या गतिमान विकासकामांचा उल्लेख करत येत्या काळात करदात्यांना कोणतीही चिंता उरणार नाही, असा आशावाद व्यक्त केला. या सभेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाक्षिणात्य भाषेतून समाजबांधवांशी संवाद साधत शुभेच्छा दिल्या. पनवेलमधील विकासकामांबाबत दाक्षिणात्य व इतर समाजघटकांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी डॉ. कविता चौतमोल, राजेश्री वावेकर, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, डॉ. घरत आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी मिळून मतदारांनी मतदानरूपी प्रेम द्यावे, असे आवाहन केले. पनवेलमधील दाक्षिणात्य समाजाचा हा एकसंघ पाठिंबा भाजप महायुतीसाठी आगामी निवडणुकीत निश्चितच बळ देणारा ठरत असल्याचे चित्र या प्रचारसभेतून स्पष्ट झाले.

# मकरसंक्रांतीसाठी हलव्याच्या दागिन्यांना मागणी

**पनवेल : वार्ताहर**

मकरसंक्रांत जवळ आली की महिलांना वेध लागतात ते हळदीकुंकू समारंभाचे, तर नववधूंना प्रतीक्षा असते ती पहिल्या संक्रांत सणाची. त्यासाठी हलव्याच्या दागिन्यांचा साज केला जातो. अवघ्या एक दिवसावर आलेल्या मकरसंक्रांतीकरिता हलव्याच्या दागिन्यांना मागणी वाढल्याचे दिसून येत आहे.

लग्नानंतरच्या पहिल्या संक्रांतीला मुलीच्या सासरी संक्रांत सणाचे वाण घेऊन जाण्याची प्रथा विविध शहरांमध्ये आहे. यासाठी पनवेल शहर व परिसरातील दुकानांमध्ये हलव्यांचे दागिने विक्रीस उपलब्ध झाले आहेत. हलव्यापासून तयार करण्यात येणाऱ्या दागिन्यांमध्ये



मंगळसूत्र, बांगड्या, तनमणी, कुड्या, राणीहार, हार, अंगठी, बाजूबंद, तोडे, शाहीहार, चापाची नथ यासारखे महिलांच्या दागिन्यांचे विविध सेट उपलब्ध आहेत. महिलांप्रमाणे नवविवाहित पुरुषांसाठीही हार, गुच्छ, पेन, मोबाइल केस, घड्याळ तसेच पाच प्रकारचे हलवे, कापडी हत्ती यासारख्या हलव्याच्या वस्तू बाजारात उपलब्ध आहेत.

संक्रांतीपासून रथसप्तमीपर्यंत नवविवाहित जोडप्यांचा पहिला संक्रांत सण साजरा केला जात असल्याने या दागिन्यांना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याचे विक्रेते सांगतात. हवामानातील बदल, साखरेचे दर यावर दागिन्यांच्या किमती अवलंबून असतात, पण एक किंमत निश्चित झाल्यावर मात्र त्यात आम्ही काही बदल करत नसल्याचे विक्रेते सांगतात.

संक्रांतीचे औचित्य साधून लहान मुला-मुलींचे बोरन्हाण केले जाते. त्यासाठी काळे झबले, कपडे घालून बाळाला हलव्याचे विविध दागिने परिधान केले जातात. मुलींसाठी मुकूट, बाजूबंद, गळ्यातील हार, कंबरपट्टा, राधासेट, तर मुलांसाठी कृष्ण सेट उपलब्ध आहे.

# भारताचे नाव उंचावणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पामा ग्लोबल द्वारे आयोजित २३व्या पामा ग्लोबल इंटरनॅशनल स्पर्धेत भारताच्या विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी केली. ही स्पर्धा मलेशिया मध्ये दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी पार पडली आणि २८ देशांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी त्यात सहभाग घेतला. अभिमानाची बाब म्हणजे भारता मधून ४४ विद्यार्थ्यांची निवड या स्पर्धेसाठी करण्यात आली होती.

पामा इंडिया या संस्थेने भारतातून विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी निवडले होते आणि त्या यादीत नवी मुंबई APPL ABACUS (जुईनगर, सानपाडा, नेरूळ)'चे ८ विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत भारताला अभिमानास्पद स्थान मिळवून दिले. सर्व विद्यार्थ्यांच्या मेहनतीला फळ आले आणि त्यात विशेष उल्लेखनीय कामगिरी केली ती विद्यार्थी सूर्यांश रासकर याने, त्याच्या कर्तृत्वामुळे त्याला चॅम्पियन क्रमांक भेटला. त्याचप्रमाणे स्वरा नंदकुमार कदम प्रथम क्रमांक, सार्थक नवनाथ लोहार, दक्ष विनोद तेरसे, विपुल मनोज यादव, दुसरा क्रमांक, दक्ष विनोद बारसकर, मानसी महेश पोपाले, रिधी शेट, तृतीय क्रमांक मिळवून यांनी भारताचे आणि जुईनगर, सानपाडा, नेरूळ शहराचे नाव उज्ज्वल केले. ही स्पर्धा विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीमत्तेचा आणि चातुर्याचा योग्य ठिकाणी उपयोग करण्याची संधी देते

या विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षक रोहिणी माळी यांच्याकडून विद्यार्थ्यांना मिळालेल्या प्रशिक्षणामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढली.

# फुंडे विद्यालयात 'दिबां'ना अभिवादन

**उरण :** तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत मंगळवारी (दि.१३) विद्यालयाचे प्राचार्य बी. बी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्ताचे झुंजार लोकनेते माजी खासदार दि. बा. पाटील यांचा १००वा जयंती सोहळा झाला.

प्रसंगी विद्यालयाच्या उपप्राचार्या एस.डी. थोरात, पर्यवेक्षिका एस.एम. बाबर, एस.एस. पाटील व उपस्थित सेवक वृंदाच्या हस्ते दि. बा.पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. विद्यालयात कांचन घुगे व क्षमृता राजभर यांनी माजी खासदार दि.बा. पाटील यांचे जीवनकार्य विशद केले. विद्यार्थी मनोगतानंतर विद्यालायातील ज्येष्ठ शिक्षक एस.डी. म्हात्रे व जे.सी. भोपी यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्यातील योगदान सांगितले. सूत्रसंचालन राधिका खामकर हिने केले. नियोजन ९ वी क च्या वर्गाने केले.



# श्रीवर्धन समुद्रकिनारी शुकशुकाट

◆ हॉटेल व्यावसायिकांवर मंदीचे सावट



**श्रीवर्धन : बातमीदार**

मागील वर्षी १४ मे महिन्यातच पावसाळा सुरू झाल्यामुळे पर्यटन व्यवसायिकांचा जवळजवळ एक महिना फुकट गेला होता. तर या वर्षी पावसाळादेखील एक महिना लांबल्याने पर्यटकांचा पर्यटन व्यवसाय एक महिना उशिरा सुरू झाला. दिवाळीची सुट्टीनंतर नाताळची सुट्टी या काळामध्ये शाळांना सुट्ट्या असल्यामुळे पर्यटक श्रीवर्धन परिसरात खूप मोठ्या प्रमाणावर येत होते. श्रीवर्धन शहरातील व तालुक्यातील बहुतेक हॉटेल व रिसॉर्ट्स हाउसफुल्ल असल्याचे चित्र पाहायला मिळत होते, परंतु आत्ता सुट्ट्यांचा मोसम संपला आहे. पुढच्याच महिन्यात दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा सुरू होतील. त्यामुळे आता पर्यटकांचा ओघ फक्त शनिवार आणि रविवार या दोनच दिवशी असणार आहे.

शनिवार आणि रविवार दोन दिवस संपूर्ण श्रीवर्धन समुद्रकिनारा पर्यटकांनी फुललेला होता. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्यावर असलेले बोटिंग व्यावसायिक, त्याचप्रमाणे इतर व्यवसाय करणारे यांच्याकडे तुफान गर्दी होती, परंतु आज सोमवारी सकाळी श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारला असता, समुद्रकिनारी पूर्ण पणे शुकशुकाट असल्याचे पाहायला मिळाले. आता पर्यटकांची संख्या वाढेल ती २४, २५ व २६ जानेवारी रोजी कारण सोमवारी २६ तारखेला सुट्टी असल्यामुळे श्रीवर्धन समुद्रकिनारा आणि श्रीवर्धन शहरातील हॉटेल्स पर्यटकांनी भरून जाणार आहेत, मात्र मधले दिवस हे पर्यटन व्यवसायिकांसाठी मंदीचे दिवस असणार आहेत.

श्रीवर्धन शहरांमध्ये शाळांच्या व महाविद्यालयांच्या सहली देखील मोठ्या प्रमाणात येतात. परंतु त्याचा फायदा या ठिकाणाच्या हॉटेल व्यवसायिकांना होत नाही. कारण सहलींचे आयोजक जेवण बनवण्याचे सर्व साहित्य व आचारी सोबत आणत असल्यामुळे समुद्रकिनारी किंवा मठाचा गवंड परिसरात सदर सहलींचे आयोजक उघड्यावर अन्न शिजवतात व त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांना जेवण वाढतात. त्यामुळे हा परिसर देखील अस्वच्छ होतो. यावरती श्रीवर्धन नगर परिषदेने कारवाई करणे आवश्यक आहे. कोणतेही पर्यटक श्रीवर्धन शहरात उघड्यावर अन्न शिजवताना आढळून आले.

जेणेकरून शहरातील हॉटेल व्यवसायिकांना येणाऱ्या सहलीं पासून आर्थिक उत्पन्न मिळेल. श्रीवर्धन समुद्रकिनारी पोलिसांनी पार्किंगची तात्पुरती व्यवस्था करून घेतली असली तरी, भविष्यात श्रीवर्धन समुद्रकिनारी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून पे अँड पार्क न केल्यास श्रीवर्धन समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांना पार्किंगची समस्या भेडसावणार आहे. श्रीवर्धनच्या आमदार व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी तातडीने पार्किंगच्या व्यवस्थेकडे लक्ष द्यावे, अशी मागणी शहरातील नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# महिलांचे उपोषण यशस्वी; बांधकाम खात्याने सुरू केले रस्त्याचे काम

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यातील भडवळ येथील कातकरवाडी, धनगरवाडी येथील रस्त्यासाठी स्थानिक महिलांचे उपोषण सुरू केल्यानंतर उपोषणाला यश आहे. या निमित्ताने महिला शक्तीची ताकद यामुळे विजय मिळाला असून रस्त्याचे काम सुरू करण्याचे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता राहुल देवांग यांनी दिले. त्यानंतर या ठिकाणी प्रत्यक्ष रस्त्याचे कामाला सुरुवात झाली.

नेरळ जवळील भडवळ गावातील धनगरवाडी येथील रहिवासी यांचा धनगरवाडीला मुख्य गावाशी जोडणारा रस्ता आजपर्यंत तयार झालेला नाही. या रस्त्याअभावी आम्हाला दैनंदिन जीवनात अत्यंत मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याबाबत आम्ही यापूर्वी अनेक वेळा संबंधित कार्यालयात तोंडी व लेखी तक्रारी केल्या आहेत, मात्र कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही किंवा गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी व आम्हाला आमचे मूलभूत हक्क मिळावेत यासाठी १२ जानेवारी रोजी उपोषणाला सुरुवात झाली होती.

धनगरवाडी, कातकरवाडी, भडवळ या ठिकाणी उपोषणास बसण्याचा निर्णय घेतला. उपोषण सुरू झाल्यानंतर अवघ्या आठ तासात प्रशासनाने तातडीने लक्ष घालून धनगरवाडीचा रस्ता मंजूर करून प्रत्यक्ष जेसीबी लाऊन खोदकाम काम सुरू करण्यात आले व लेखी निवेदन, बांधकाम विभागाचे राहुल देवांगे यांनी लेखी निवेदन दिले. त्यानंतर उपोषणाला बसलेले महिला यांनी रस्त्याचे काम सुरू झाल्याचे पाहून उपोषण स्थगित केले. लवकरात लवकर काम पूर्ण केले नाही तर नाईलाजास्तव आम्हाला पुन्हा एकदा उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल. योग्य ती दखल घेऊन तातडीने काम पूर्ण करा. असे खडसावून सांगण्यात आले.

या वेळी नयना गोरे, मयुरी शिंगाडे, जयश्री आखाडे, संगीता गोरे, मीना आखाडे, वनिता आखाडे, जयश्री शिंगटे संगीता शिंगटे अशा शिंगाडे, भारती बावदाने, बेबी आखाडे, नेहा आखाडे, रमीबाई गोरे, संगीता गोरे आदी उपस्थित होत्या.

# सोनगाव येथे स्वच्छता रॅली, ग्राम परिसर स्वच्छता मोहीम

**रोहा : प्रतिनिधी**



सुदर्शन केमिकल लिमिटेड, रायगड जिल्हा परिषद शाळा सोनगाव व ग्रुप ग्रामपंचायत मढाली खुर्द यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवारी (दि.११) रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनगाव येथून स्वच्छता रॅली व ग्राम परिसर स्वच्छता स्वच्छ भारत, सुंदर भारत अभियान अंतर्गत स्वच्छता मोहीम उपक्रम राबवण्यात आला.

या वेळी सोनगाव शाळेपासून ते गावापर्यंत स्वच्छता रॅली काढण्यात आली व गावातील परिसराची साफसफाई करून सुक्या कचऱ्याचे योग्य ते व्यवस्थापन करण्यात आले. या राष्ट्रीय कार्यासाठी सुदर्शन केमिकल सीएसआरचे प्रतिनिधी संग्राम पाटील, सुदर्शन क्लॅरिएंट सीएसआरचे प्रतिनिधी पराग फुकणे, सुनील दळवी, ग्रुप ग्रामपंचायत मढाली खुर्दच्या ग्रामसेविका प्रतिक्षा कांबळे, सोनगाव शाळेचे मुख्याध्यापक संतोष धोत्रे, शिक्षक ब्रिजेश भादेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक भोईर, उपाध्यक्ष राधा शेलार, सदस्य सुशील खांडेकर, सदस्या अर्चना चव्हाण, सदस्या सुजाता वाघमारे, सदस्य राजेंद्र खांडेकर, अनंता जंगम, स्वप्निल बलकावडे, संध्या शेलार, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रमोद खांडेकर, खजिनदार योगेंद्र जाधव, पोलीस पाटील योगेश जंगम, माजी उपसरपंच मेघना शेलार, नितेश शेलार ग्रामपंचायत सदस्य, सोनगाव अंगणवाडी मदतनीस रेखा चव्हाण, अजिंक्य जंगम, ग्रामस्थ उत्तम गोळे, सखाराम गोळे, शंकर शेलार, तृपेश बलकावडे, राजेश मांडलुस्कर, हर्षदा कुलकर्णी, सोनाली भोईर, योगिता खांडेकर, अश्विनी शिंदे, निलिमा खांडेकर, प्रदीप गोळे, जितेंद्र जाधव, दिव्या बलकावडे, समृद्धी शेलार ,निलेश गोळे, सारिका गोळे, सुगंधा मुंडे, मिलिंद जंगम, संचित खांडेकर, विलास जंगम, रोहन जंगम, सहादेव भोईर आदी उपस्थित होते.

उपक्रमासाठी सुदर्शन केमिकल, खांडेकर डेकोरेशन, मढाली खुर्द ग्रामपंचायतचे एकनाथ शेलार, रा.जि.प.शाळा धामणसईचे विद्यार्थी, माजी विद्यार्थी संघ, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण मित्र मंडळ यांचेही सहकार्य लाभले.

# माणगावच्या बहुप्रतीक्षित नाट्यगृहाचे बांधकाम रखडले

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव शहरातील सांस्कृतिक जीवनाला नवी दिशा देणारे, बहुप्रतीक्षित आणि बहुचर्चित नाट्यगृह आजही निधीअभावी अर्धवट अवस्थेत उभे आहे. गेली तब्बल आठ वर्षे हे बांधकाम रखडले असून त्यामुळे माणगावसह परिसरातील नाट्यरसिक, कलाकार आणि सांस्कृतिक चळवळीशी जोडलेले घटक प्रचंड निराशा आणि संताप व्यक्त करत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही शासनाकडून आवश्यक निधी मिळत नसल्याने हे स्वप्न अद्याप अपूर्णच आहे.

सोमवार ८ जानेवारी २०१८ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात या नाट्यगृहाचे भूमिपूजन व बांधकामाचा शुभारंभ करण्यात आला होता. सुरुवातीला काही प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने काम वेगाने सुरू झाले, मात्र मंजूर निधीपेक्षा अधिक काम झाल्याने पुढील टप्प्यासाठी निधीची गरज भासू लागली. निधी लवकरच मिळेल या आशेवर ठेकेदारांनी काम सुरू ठेवले, पण कालांतराने ही आशा फोल ठरली. आठ वर्षांच्या कालावधीत बांधकाम साहित्याचे दर प्रचंड वाढले असून, त्यामुळे आज या नाट्यगृहाच्या पूर्णत्वासाठी वाढीव निधी अत्यावश्यक झाला आहे. निधी न मिळाल्याने सध्या हे काम पूर्णतः थांबविण्यात आले असून, अर्धवट बांधकाम माणगावच्या सांस्कृतिक उदासीनतेचे प्रतीक बनत चालले आहे.

हे अत्याधुनिक नाट्यगृह जुने माणगाव येथील शासकीय विश्रामगृहासमोरील शासनाच्या सुमारे दोन एकर जागेवर उभारण्यात येत आहे. सुमारे ७०० प्रेक्षकांची आसन क्षमता, आधुनिक प्रकाश व ध्वनी व्यवस्था, कलाकारांसाठी आवश्यक सुविधा तसेच मोठ्या वाहनतळाची व्यवस्था या नाट्यगृहात प्रस्तावित आहे. हे काम पूर्ण झाले असते तर हे नाट्यगृह माणगावच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणारे ठरले असते. माणगाव शहरात विविध सामाजिक, सांस्कृतिक व नाट्य कार्यक्रमांसाठी स्वतंत्र नाट्यगृह असावे, हे स्वप्न स्व. माजी आमदार अशोकदादा साबळे यांनी पाहिले होते. त्यांच्या या स्वप्नाला साकार करण्यासाठी त्यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यातूनच या नाट्यगृहास मान्यता व मंजुरी मिळाली, मात्र आवश्यक निधी वेळेत उपलब्ध न झाल्याने शासनाची अनास्था उघडकीस येत असून, आज हे स्वप्न अर्धवट अवस्थेतच अडकून पडले आहे.

प्रत्यक्षात निधी कधी मिळणार आणि हे नाट्यगृह कधी पूर्ण होणार, याकडे आज संपूर्ण माणगावकरांचे लक्ष लागले आहे. सांस्कृतिक शहर म्हणून ओळख निर्माण करण्याची संधी हातातून निसटू नये, हीच अपेक्षा आज प्रत्येक नाट्यरसिक व्यक्त करत आहे.

### निधीची ग्वाही

***दरम्यान, या संदर्भात खासदार सुनील तटकरे यांनी सकारात्मक भूमिका मांडत माणगावच्या या नाट्यगृहासाठी लवकरच संपूर्ण निधी उपलब्ध करून दिला जाईल. हे नाट्यगृह पूर्ण होऊन माणगावातील नाट्यरसिकांचे स्वप्न तसेच स्व. अशोकदादा साबळे यांची संकल्पना प्रत्यक्षात साकार होईल, अशी ग्वाही दिली.***

# माणगाव येथे कायदेविषयक कार्यशाळा

◆ **नवीन कायद्याची सखोल मांडणी**
◆ **वकील-विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**



**माणगाव : प्रतिनिधी**

बदलत्या कायदेशीर व्यवस्थेत नव्या कायद्यांचे सखोल आकलन व्हावे, या उद्देशाने अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय, माणगाव आणि अधिवक्ता परिषद, माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक कार्यशाळा उत्साहात पार पडली.

या कार्यशाळेचा केंद्रबिंदू 'भारतीय साक्ष अधिनियम २०२३' हा महत्त्वपूर्ण विषय होता. जुना पुरावा कायदा आणि नव्या साक्ष अधिनियमातील मूलभूत बदल, त्यामागील तत्त्वज्ञान व प्रत्यक्ष व्यवहारातील उपयोग यांचा सखोल ऊहापोह या कार्यशाळेत करण्यात आला.

कार्यक्रमाचे मुख्य वक्ते म्हणून बार कौन्सिल महाराष्ट्र व गोव्याचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. सुधाकरराव आव्हाड उपस्थित होते. त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व अनुभवसंपन्न मार्गदर्शनातून कायद्याचे विद्यार्थी, नवोदित वकील तसेच ज्येष्ठ वकिलांसाठी उपयुक्त ठरेल अशी सर्वसमावेशक मांडणी केली. साक्ष्य अधिनियम समजावून सांगताना, पुरावा कायद्याची जाण भारतीय समाजाला हजारो वर्षांपूर्वीपासूनच होती, असे ठाम प्रतिपादन करत त्यांनी कात्यायन स्मृती, वैदिक ज्यूरीसप्रुडन्स यांसारख्या ऐतिहासिक संदर्भांचा उल्लेख केला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे यांनी भूषविले. प्रमुख उपस्थिती म्हणून ॲड. संतोष पवार (जिल्हा सरकारी अभियोक्ता तथा अध्यक्ष, अधिवक्ता परिषद रायगड-अलिबाग), ॲड. श्रीराम ठोंसर (सचिव, अधिवक्ता परिषद कोकण प्रांत) ज्येष्ठ ॲड. प्रकाश ओक यांची उपस्थिती लाभली.

ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचे चेअरमन ॲड. विनोद घायाळ, कार्यकारिणी सदस्य ॲड. सुशील दसवते तसेच प्राचार्या डॉ. सोनाली बुरटे यांनी विशेष लक्ष दिले. अधिवक्ता परिषद माणगावचे अध्यक्ष ॲड. योगेश तेंडुलकर, सचिव ॲड. सुजित मेहता, ॲड. प्रकाश म्हात्रे, ॲड. प्रवीण मुसळे, ॲड. चेतन चव्हाण यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.

महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारीवर्गाचेही उल्लेखनीय सहकार्य लाभले. कार्यशाळेला मोठ्या संख्येने वकील, कायद्याचे विद्यार्थी तसेच पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात नवीन टायपिंग संस्था मान्यतेसाठी समन्वय समिती गठीत

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील संगणक टायपिंग प्रशिक्षण संस्थांना नवीन मान्यता, स्थलांतर व हस्तांतरणाबाबत प्राप्त प्रस्तावांच्या छाननीसाठी जिल्हास्तरीय समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

रायगड जिल्हा परिषद, अलिबाग येथील माध्यमिक शिक्षण विभागाने याबाबत अधिकृत आदेश निर्गमित केला असून, संबंधित सर्व प्रस्तावांची तपासणी करून ते जिल्हा समन्वय समितीसमोर सादर करण्यात येणार आहेत.

या समितीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), उपशिक्षणाधिकारी, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक यांच्यासह राज्य संघटनेचे जिल्हा प्रतिनिधी पंकज ए. ठाकूर (अलिबाग), रायगड जिल्हा उपाध्यक्ष समीर म. गोरे (महाड) व जिल्हा सचिव राजेश म. श्रीवर्धनकर (रोहा) यांचा समावेश करण्यात आला आहे.

या निर्णयामुळे संगणक टायपिंग प्रशिक्षण संस्थांच्या मान्यता प्रक्रियेला पारदर्शकता येणार असल्याचे मत शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

# लोधीवली ग्रामपंचायतीतर्फे नावीण्यपूर्ण उपक्रम

**चौक : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियान यशस्वी करण्यासाठी ग्राम पंचायत लोधीवली सर्वच स्तरातून प्रयत्न करताना दिसून येत असून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत, याला ग्रामस्थ चांगल्या प्रकारे मदत करीत असल्याचे सरपंच पूजा तवले यांनी सांगितले.

सुशासनयुक्त पंचायत लोकाभिमुख करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये नागरिकांना वेगवेगळ्या सुविधा देण्यात येत आहेत आणि ग्रामपंचायतचे १ ते ३३ नमुने अद्यावत करण्यात आलेले आहेत. मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियान अंतर्गत ५० टक्के करमाफीचा फायदा होत असून घरपट्टी वसुल होत असल्याने सक्षम पंचायत होईल, परिसरातील उद्योग क्षेत्रातून सीएसआर व लोकवर्गणीतून ग्राम पंचायत आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत,

जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करण्यासाठी ओढा, नाला तसेच वनराई बंधाऱ्याचे महत्व विषद करून तेही काम सुरू आहे. लोधीवली ग्राम पंचायत क्षेत्रातील सामाजिक,आर्थिक संस्था, पतपेढी यांचे सक्षमीकरण करून स्थानिक स्तरावर व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न केला जात आहे. मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत अभियानात स्थानिक पातळीवर लोकसहभाग, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, सामाजिक संस्था,शिक्षक, अंगणवाडी सेविका मदतनीस यांचे सहकार्य घेऊन श्रमदानात माध्यमातून लोकचळवळ निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू झाला आहे. ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली हद्दीतील महिला बचत गट तरुण मित्र मंडळ, ग्राम पंचायत कर्मचारी वर्ग, भजनी मंडळ, व सर्व ग्रामस्थ व महिला भगिनी यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे, असे सरपंच पूजा नितीन तवले यांनी सांगितले.

# चौल तुलाडदेवी येथे रस्ता नूतनीकरणाचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**



चौल तुलाडदेवी येथे रस्ता नुतनीकरणाचे भूमिपूजन कार्यक्रम नुकताच झाला. चौल तुलाडदेवी नारायण तळे नजीक स्मशानभुमी रस्ता व चौल टेंभी गल्ली-इजरायल स्मशानभुमी रस्ता नुतनीकरणाचे भुमिपुजन कार्यक्रम घेण्यात आला.

चौल जिल्हा परिषदेचे शिवसेना उमेदवार डॉ. सचिन राउळ यांचे मागणीने आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयन्ताने सदर दोन्ही रस्ताचे नुतनीकरणाचे काम मंजूर झाल्याचे कळविण्यात आले.

चौल तुलाडदेवी नारायण तळे नजीक स्मशानभुमी रस्ता व चौल टेंभी गल्ली-इजरायल स्मशानभुमी रस्ता नुतनीकरणाचे भुमिपुजन कार्यक्रम डॉ. सचिन राउळ यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडला, या वेळी नितिन दिलिप राउत, अमित दिलिप राउत, कल्पेश किशोर नाईक, सुभाष राउत, अशोक गुरव, मंगेश ठाकूर, गणेश पाटील, दिलिप राऊत, संदीप घरत, निखिल राउत, प्रशांत शेवणईकर सिंध्देश शेवणईकर, ग्रामस्थ अनिल ठाकूर, मोहन पराड, समीर राउत, गजानन ठाकूर, रविंद्र घरत, विलास म्हात्रे, आदेश ठाकूर, अशोक राउत, काशिनाथ राउत, विकास घाडगे, सतिश म्हात्रे, साधना म्हात्रे, मोहन म्हात्रे, रोशन म्हात्रे, किशोर कवळे विभागीय संघटिका तनुजा मोरे, शाखाप्रमुख प्राजक्ता नितिन राउत, उपशाखा प्रमुख शितल अमित राउत, मीना सुभाष राउत, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस विभागीय अध्यक्ष महेश कवळे आदीची उपस्थिती होती.

चौल ग्रामपंचायत हद्दीत आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्नाने प्रत्येक प्रभागामध्ये अनेक रस्ते नुतनीकरण, गटारे आदीची कामे होत असल्याचे डॉ. सचिन राउळ यांनी म्हटले.

# आरसीबीचा यूपीवर एकतर्फी विजय

## हॅरिसची वादळी खेळी; मानधनाचीही फटकेबाजी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील पाचवा सामना यूपी वॉरियर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन संघांमध्ये पार पडला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना यूपी वॉरियर्सला पाच गडी बाद १४३ धावांपर्यंत मजल मारता आली. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने एकतर्फी विजयाची नोंद केली आहे.

पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या यूपी वॉरियर्सचा धावांचा गाडा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी अवघ्या १४३ धावांवर थांबवला. बंगळुरू संघाची मजबूत बॅटिंग लाईनअप पाहता हे आव्हान फार मोठे नव्हते. या धावांचा पाठलाग करण्यासाठी बंगळुरूकडून सलामीला आलेल्या ग्रेस हॅरिस आणि स्मृती मानधनाने यूपी वॉरियर्सच्या गोलंदाजांचा समाचार घेतला.

या डावातील सहावे षटक या सामन्यातील सर्वात महागडे षटक ठरले. मानधना आणि हॅरिसची जोडी धावांचा पाऊस पाडत असताना डिएंड्रा डॉटीन गोलंदाजीला आली. या षटकातील पहिलाच चेंडू तिने नो चेंडू टाकला. या चेंडूवर ग्रेस हॅरिसने चौकार मारला. त्यानंतर पुढील चेंडूवर तिने चौकार मारला. षटकातील दुसऱ्या चेंडूवर तिने चौकार, तिसऱ्या चेंडूवर तिने षटकार मारला. चौथा चेंडूदेखील तिने सीमापार पोहचवला. पाचव्या चेंडूवर तिने चौकार मारला. यासह तिने एकाच षटकात ३२ धावा वसूल केल्या. हॅरिसने ४० चेंडूत १० चौकार आणि पाच षटकारांसह ८५ धावांची खेळी करून बाद झाली, तर मानधनाने ३२ चेंडूत नऊ चौकारांसह ४७ धावा केल्या. याशिवाय रिचा घोष चार धावांवर नाबाद राहिली. हा सामना बंगळुरूने नऊ गडी राखून आपल्या नावावर केला.



तत्पूर्वी यूपी वॉरियर्सला सुरुवातीला मोठे धक्के बसले. संघातील प्रमुख फलंदाज स्वस्तात माघारी परतले. मेग लेनिंग १४, हरलिन देओल ११, फिबी लिचफिल्ड २० धावा करत माघारी परतली, तर किरण नवगिरेला अवघ्या पाच धावा करता आल्या. शेवटी फलंदाजी करताना दीप्ती शर्माने नाबाद ४५ धावा केल्या, तर डिएंड्रा डॉटीनने नाबाद ४० धावा केल्या. या खेळीच्या बळावर यूपी वॉरियर्सने पाच गडी बाद १४३ धावा केल्या होत्या.

### रोह्यात रंगली कबड्डी स्पर्धा

## रायवाडी संघ भाजप तालुकाध्यक्ष चषकाचा मानकरी

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने भाजप रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य कबड्डी स्पर्धेला मोठा प्रतिसाद लाभला. शेवटपर्यंत रंगलेल्या या सामन्यात पांडवदेवी रायवाडी संघाने विजय मिळवत भाजप तालुकाध्यक्ष चषकावर आपले नाव कोरले.

या स्पर्धेत जिल्ह्यातील तब्बल ३२ संघांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धा पाहण्यासाठी कबड्डीप्रेमींची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. स्पर्धेचे उद्घाटन प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अशोक जाधव तसेच रोहा सिटीझन फोरमच्या सदस्यांच्या उपस्थितीत हस्ते करण्यात आले.



द्वितीय क्रमांक भैरवनाथ यशवंतखार, तृतीय काळभैरव भारजे आणि चतुर्थ क्रमांक गावदेवी रोठ संघाने पटकाविला. सर्वोत्कृष्ट खेळाडू प्रशांत जाधव (रायवाडी), उत्कृष्ट चढाईपटू रोशन महवी (यशवंतखार), उत्कृष्ट पकड करणारा सुमित मोरे (भारजे) आणि पब्लिक हिरो रोहित कांबळे (रोठ) ठरला. विजेते संघ आणि उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. अशोक जाधव तसेच रोहा सिटीझन फोरम यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेस गुणाजी घाग, हरिभाऊ घाग, भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग, राजमुद्रा फाउंडेशनचे कार्याध्यक्ष राजेश भगत, सरचिटणीस कृष्णा बामणे, जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, युवा मोर्चा सरचिटणीस नरेश कोकरे, धाटाव विभाग अध्यक्ष सचिन मोरे, तालुका उपाध्यक्ष दीपक मोरे, सोशल मीडिया संयोजक सनील इंगावले, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर जाधव, गौरव मोरे, सागर जोगडे, रितेश किर्तने, सुबोध पाटील, निलेश धुमाळ, गणेश भगत, अथर्व बाईत, सुरज मोरे, रोहित कांबळे, रितेश घाग, अमोल घाग, अमोल सानप, सौरभ मोरे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन रूपेश डाकी यांनी केले.

## बेंच प्रेस चॅम्पियनशिपमध्ये जितेश साजेकरला कांस्यपदक

**पेण : रामप्रहर वृत्त**

३४वी नॅशनल बेंच प्रेस चॅम्पियनशिप (क्लासिक व क्युपाईड) २०२५-२६ ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा हरियाणातील फरीदाबाद येथे झाली. या स्पर्धेत पेणमधील सुहित जीवन ट्रस्टच्या जितेश पांडुरंग साजेकर या विद्यार्थ्याने कांस्यपदक पटकाविले आहे.



जितेशचे हे यश केवळ वैयक्तिक नसून त्यामागे संस्थेचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, संस्थेचे शिक्षक अमोल काईनकर. पेणमधील हनुमान व्यायामशाळेचे प्रशिक्षक राजेश अनगद, पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे सचिव अरुण पाटकर व पालकांचाही वाटा आहे. या यशाबद्दल जितेशचे अनेकांनी अभिनंदन केले.

### विजय हजारे ट्रॉफी

## मुंबईला नमवत गतविजेता कर्नाटक संघ सेमीफायनलमध्ये

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील पहिल्या क्वार्टर फायनल लढतीत करुण नायर आणि देवदत्त पडिक्कलच्या दमदार खेळीच्या जोरावर कर्नाटक संघाने मुंबईला स्पर्धेतून बाहेर काढले. दुसऱ्या क्वार्टर फायनलमध्ये सौराष्ट्र संघाने उत्तर प्रदेश संघाला बाहेरचा रस्ता दाखवत सेमीचे तिकिट पक्के केले. बंगळुरुस्थित बीसीसीआय सेंटर ऑफ एक्सलेन्सच्या वेगवेगळ्या मैदानात खेळवण्यात आलेल्या दोन्ही क्वार्टर फायनल लढतीत पावसाचा व्यत्यय आला. त्यामुळे दोन्ही सेमीफायनलिस्ट हे व्हीजेडी पद्धतीनुसार ठरवण्यात आले.



मुंबईच्या संघाने शम्स मुलानीच्या पहिल्यांदा फलंदाजी करताना २५४ धावा करत ८६ धावांच्या जोरावर मुंबईच्या संघाने निर्धारित ५० षटकात आठ विकेट्सच्या मोबदल्यात २५४ धावा करत गतविजेत्या कर्नाटक संघासमोर २५५ धावांचे टार्गेट सेट केले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना कर्नाटकचा देवदत्त पडिक्कलने ९५ चेंडूत नाबाद ८१ धावा केल्या. दुसऱ्या बाजूला करुण नायर याने ८० चेंडूत ७४ धावा केल्या. ३३व्या षटकात संघाच्या धावफलकावर १८७ धावा लावल्या होत्या. पावसाच्या व्यत्ययामुळे सामना थांबल्यामुळे व्हीजेडी पद्धतीनुसार कर्नाटकने ५५ धावांनी विजय मिळवला.

### सौराष्ट्रनेही पक्की केली जागा

दुसऱ्या क्वार्टर फायनलमध्ये उत्तर प्रदेश आणि सौराष्ट्र यांच्यात सामना रंगला होता. या सामन्यात रिंकू सिंहच्या नेतृत्वाखालील यूपीच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना अभिषेक गोस्वामी ८८ (८२) आणि समीर रिझवी ८८ (७७) यांच्या दमदार खेळीच्या जोरावर निर्धारित ५० षटकात आठ विकेट्च्या मोबदल्यात ३१० धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना सौराष्ट्र संघाकडून सलामीवीर हार्विक देसाई याने नाबाद शतक झळकावले. सौराष्ट्र संघाच्या डावातील ४०.१ षटकानंतर पावसाचा व्यत्यय आला. खेळ थांबला त्या वेळी सौराष्ट्र संघाच्या धावफलकावर ३ बाद २३८ धावा होत्या. व्हीजेडी पद्धतीनुसार या संघाला १७ धावांनी विजय मिळाला.

## ऑस्ट्रेलियन कर्णधार एलिसा हिलीची निवृत्ती



**सिडनी : वृत्तसंस्था**

यंदा पुरुषांच्या टी-२० विश्वचषकासह महिलांचा विश्वचषकदेखील खेळवला जाणार आहे. महिलांचा टी-२० विश्वचषक जून-जुलैमध्ये इंग्लंडच्या यजमानपदाखाली होणार असून तत्पूर्वी ऑस्ट्रेलिया संघाला मोठा धक्का बसला आहे. ऑस्ट्रेलिया महिला संघाची कर्णधार व आठ वेळची वर्ल्डकप विजेती खेळाडू एलिसा हिलीने अचानक निवृत्तीची घोषणा करत सर्वांनाच धक्का दिला आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६मध्ये भारताविरुद्ध होणाऱ्या मल्टी-फॉरमॅट मालिकेनंतर एलिसा हिली क्रिकेटमधून निवृत्त होणार आहे. २०२३च्या अखेरीस मेग लॅनिंगच्या जागी हिलीला पूर्णवेळ कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले. या वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषकाची तयारी ऑस्ट्रेलियाला सुरू करता यावी म्हणून ती भारताविरुद्धच्या टी-२० मालिकेत खेळणार नाही, पण ती एकदिवसीय सामने खेळेल आणि नंतर तिच्या कारकिर्दीचा शेवट ११व्या कसोटी सामन्याने करेल, जो ६ ते ९ मार्चदरम्यान वाका येथे एक डे-नाईट सामना असेल.

## केएल राहुलने टाकले विराटला मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यूझीलंडविरुद्ध पार पडलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात केएल राहुलने विजयी षटकार ठोकून भारतीय संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. या एका षटकारासह त्याने टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीला मागे टाकले आहे.

केएल राहुल हा भारतीय संघातील एक अष्टपैलू गुणवैशिष्ट्ये असलेला फलंदाज मानला जातो. आंतरराष्ट्रीय पदार्पणापासून त्याने संघासाठी सलामीवीर ते यष्टिरक्षक अशा अनेक भूमिका चोख बजावल्या आहेत. सध्या तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये 'फिनिशर'ची जबाबदारी यशस्वीपणे सांभाळत आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेत पहिल्याच सामन्यात राहुलने षटकार खेचून संघाला विजय मिळवून दिला. या कामगिरीसह त्याने विराट कोहलीला पिछाडीवर टाकले असून आता या यादीत त्याच्यापुढे केवळ माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी आहे.

एकदिवसीय क्रिकेटमध्ये षटकार मारून सामना जिंकवून देणाऱ्या भारतीय फलंदाजांच्या यादीत एमएस धोनी पहिल्या क्रमांकावर आहे. धोनीने आपल्या कारकिर्दीत एकूण नऊ वेळा षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला आहे. राहुलने रविवारी सहाव्यांदा ही किमया साधली आणि तो या यादीत दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे.

विराट कोहलीने आतापर्यंत पाच वेळा अशी कामगिरी केली असून तो आता तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. आता मालिकेतील दुसरा सामना १४ जानेवारी रोजी राजकोट येथे खेळवला जाणार आहे.

## अमिताभ आणि सचिनमध्ये रंगला 'फिंगर क्रिकेट'चा सामना

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूडचे 'महानायक' अमिताभ बच्चन आणि क्रिकेट जगतातील 'नायक' सचिन तेंडुलकर यांचा एका खास क्षणाचा व्हिडीओ समोर आला असून यामध्ये अमिताभ चक्क सचिनसोबत 'फिंगर क्रिकेट' खेळताना दिसत आहेत.

हा मजेशीर प्रसंग इंडियन स्ट्रीट प्रीमियर लीग (आयएसपीएल) च्या निमित्ताने पहायला मिळाला. अमिताभ बच्चन यांनी स्वतः त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर हा व्हिडीओ शेअर केला असून त्याला क्रिकेटच्या देवासोबत फिंगर क्रिकेट खेळताना असे कॅप्शन दिले आहे. व्हिडीओमध्ये दिसतंय की, दोघेही खूप उत्साहात आहेत. जेव्हा अमिताभ खेळताना बाद होतात, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव अत्यंत निरागस आणि मजेशीर आहेत, ज्याने नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

पुढे दोघांमध्ये तीन सीरिजची फिंगर क्रिकेट मॅच रंगते. पहिल्या मॅचमध्ये अमिताभ सचिनला आऊट करतात. दुसऱ्या मॅचमध्ये अमिताभ जिंकतात. शेवटी तिसऱ्या मॅचमध्ये सचिन रन्स करत असतो. तेवढ्यात त्याचा आणि अमिताभ यांचा स्कोर समान होतो. त्यामुळे अमिताभ म्हणतात, ही मॅच टाय झाली म्हणून घोषित करा आणि अर्धी ट्रॉफी मला आणि अर्धी यांना देऊन टाका.

## भर सामन्यात रिझवानचा अपमान

**सिडनी : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा स्टार यष्टीरक्षक-फलंदाज मोहम्मद रिझवान याच्यासाठी सध्याचा काळ अत्यंत कठीण जात असल्याचे दिसून येत आहे. बिग बॅश लीग २०२५-२६मध्ये मेलबर्न रेनेगेड्सकडून खेळणाऱ्या रिझवानला सिडनी थंडरविरुद्धच्या सामन्यात अत्यंत धीम्या गतीने धावा केल्यामुळे कर्णधाराने चक्क रिटायर्ड आउट होण्याचा इशारा दिला आणि त्याला अनिच्छेने मैदान सोडावे लागले.



या सामन्यात रिझवान चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आला होता, मात्र सिडनी थंडरच्या गोलंदाजांसमोर त्याला धावा काढण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. रिझवानने २३ चेंडूत केवळ २६ धावा केल्या, ज्यात दोन चौकार आणि एक षटकाराचा समावेश होता. संघाची धावगती मंदावल्याचे पाहून कर्णधाराने रिझवानला रिटायर्ड आउट होण्याचा इशारा दिला. त्यानंतर रिझवान नाराज झाला आणि मान खाली टेकवून पॅव्हेलियनमध्ये परतला.

## विराटचा डुप्लिकट; किंग कोहलीने नाव दिले 'छोटा चिकू'

**वडोदरा : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या पहिल्या वनडे सामन्यापूर्वी विराट कोहलीसारख्या दिसणाऱ्या लहान मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. स्वतः विराट या लहान मुलाला ऑटोग्राफ देत असल्याचा एक फोटो व्हायरल झाला. त्या मुलाचा इंटरव्ह्यू घेण्यात आला, ज्यामध्ये त्याने विराट त्याला पाहून काय म्हणाला होता हे सांगितले.

लहानपणीच्या विराट कोहलीसारखा चेहरा असलेल्या या मुलाचे फोटो, व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या मुलाचे नाव गर्वित उत्तम असे असून विराटने त्याचा उल्लेख 'छोटा चिकू' असा केला. विराटचे टोपणनाव चिकू असे आहे, यावरून त्याने या त्याच्यासारख्या दिसणाऱ्या मुलाला छोटा चिकू म्हटले.



विराटच्या बालपणीसारखा दिसणाऱ्या मुलाने एका मुलाखतीत खुलासा केला की, जेव्हा त्याने विराट कोहलीला पाहिले आणि विराट-विराट म्हणत त्याला आवाज दिला. विराटने त्याच्याकडे पाहत त्याला सांगितले, थांब मी थोड्या वेळात येतो. मुलाने पुढे म्हटले की थोड्या वेळाने तो आला तेव्हा तो रोहित शर्माला सांगत होता, तो बघ तिथे माझा डुप्लिकेट बसला आहे. मला तो छोटा चिकू म्हणाला. विराटने गर्वितला सांगितले की आतापासून तू माझा मित्र आहेस.

बालपणीच्या विराटसारखा दिसणारा गर्वित उत्तम हा मूळचा हरियाणाच्या पंचकूला येथील आहे. त्याला विराटला भेटण्यासाठी त्याच्या कुटुंबासह वडोदराला बोलावले होते. देशातील एका जाहिरात कंपनीने बालपणीच्या विराटसारखा दिसणाऱ्या मुलाची जाहिरातीसाठी शोधमोहीम सुरू केली तेव्हा गर्वित भेटला होता, अशी माहिती मिळाली आहे.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com